REGISTERED N.

महिना ,, २ ... ८
... अखेर ,, ७ ,,
किरकोळ अंकास.........................८४
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........८१ ०६
दुसरे खेपेस .... .... ....८१

Six monthly .........3 ............... 8 as
Single copy .......................... 4 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line ...3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVI AKOLA MONDAY 6 OCTOBER 1902 NO 29

वर्ष ३६ आकोला सोमवार तारीख ६ माहे आक्टोबर सन १९०२ इ० अंक २९

**Kadi** हें काय आहे ?

डाक्टर डी. एम. दस्तुर यांनी तयार केलेलीं दमा व खोकला या वरील रामबाण औषधी.

दमा आणि खालील सर्व रोगांवर तात्कालिक व गुणकारक उपाय हाच आहे. जेथें डाक्तरांचा व इतरांचा कोणाचाही उपाय चालत नाहीं तेथें हें फार उपयोगी पडतें. याच्या गुणाबद्दल हिंदुस्थान, इंग्लंड व अमेरिका येथील रोगग्रस्तांचे व डाक्तरांचे शेंकडों चांगले अभिप्राय आहेत. कितीही जुनाट दमा, फार दिवसांचा खोकला, घशांत घरघर अवाज होणें, वारंवार सरदी व पडसें होणें, व ताप येणे, ससनी, ब्रान्कायाटिस इन्फ्युएन्झा इत्यादि रोगांवर हें फार उपयोगी आहे. बाटलीची किंमत सारा १॥ रुपया आहे. परंतु हें रोग्यांस एक हजार रुपयांच्या किंमतीचें वाटतें.

पत्ता--मेसर्स पेस्तमजी आणि सन दुकान आकोला.

## मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल:—

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारी च्या १ ले तारखे पासुन तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपयापर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १।७।०२ } J. Kinniburgh एजंट

## दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्या दांताच्या आजारा शिवाय इतर हरएक प्रकारच्या दाताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अक्सीर का दांतो मे दिखाते है हम।
चोट डंके की हरेक मर्ज उडाते हम ॥




मोठी डबी.... १ रु.
लहान ,, .... ।।-

दांतावर जाळें जमणें, ते पिवळे होणें, हिरड्या ढुलणें, दांत आंबणें, हलं लागणें, कमजोर होणें, भेगा पडणें, किडे पडणें, वांकडें तिकडे होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दांतानीं फोडतां न येणें, दांत मळकट घाणेरडे राहणें, त्यातून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहींशीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग या पासून राहणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस् आकोला.

देखना चाहिये क्या मुल्क कदर करती हे।
ढूंढते फिरते हरेक सिम्त कदरदां हैं हम ॥

पत्ता—

नन्दलाल वर्मा

म्यानेजर फ्रेण्ड अँण्ड कम्पनी मथुरा.

सदृशं चेष्टते स्वस्याः
प्रकृते र्ज्ञानवानपि ॥
प्रकृतिं यान्ति भूतानि
निग्रहः किं करिष्यति ॥

( रावसाहेब शेवडे यांचें व्याख्यान )

नंबर ६

अशा मुलास स्वतंत्र पणें वागण्यास दूर सोडून द्यावें आणि आपण दूर उभें राहून गंमत पाहावी. अशा वेळीं कोणी मुलें अचावचा बोलतील, कोणी दुसऱ्याच्या खोड्या करतील, कोणी कांहीं तरी बोलून खूप हंसत राहतील, कोणी मातींत लोळूं लागून आपल्या व दुसऱ्याच्या अंगावर माती फेंकतील, कोणी चावटपणाच्या गोष्टी काढून ह्या तऱ्हेचे उद्योग करूं लागतील, कोणी आपण कांहीं खेळ खेळूं असें ह्मणून ह्या व्यवस्थेला लागतील, कोणी आपण कांहीं खायाला आणूं असें ह्मणून पैसे गोळा करून खायाला आणायाच्या उद्योगाला लागतील, कोणी तेथें कुत्रें, मांजर किंवा कांहीं जीव जंतु असल्यास त्यांना दुःख देणाऱ्या किंवा मारण्याच्या उद्योगाला लागतील, अशा भिन्न भिन्न वयाच्या मुलांच्या अनेक प्रकारच्या चेष्टा चाललेल्या दिसतील. या चेष्टा जो लक्षपूर्वक पाहील त्याला प्रकृति ह्मणून कांहीं आहे हें समाधान-कारक रीतीनें कळेल. अशा प्रसंगींच्या मुलांच्या चेष्टा पाहून मार्मिक प्रेक्षक तीं तीं मुलें पुढें कशीं निघतील याचें अनुमान करितात व तें अनुमान बरेंच खरें ठरतें.

आतां अखेरीस या श्लोकावर मोठा प्रश्न असा येतो कीं, प्रकृति बलिष्ठ आहे, आणि तिजपुढें ज्ञानी मनुष्याचा किंवा साक्षात् परमेश्वराचाही निग्रह चालत नाहीं, असें भगवंतांनीं सागितलें हें सर्व कबूल आहे. मग पुढें काय? प्रकृतीची बलिष्ठता आणि ज्ञानाचा दुर्बळपणा कळून करायाचें काय? आणि शिवाय ज्ञान जर दुर्बळ आहे, तर मग पुढें सुधारणा व्हावी कशी? तर भगवान् इतकेंच सांगून स्वस्थ बसले नाहींत. त्यांनीं प्रकृतीला जिंकण्याचा उपाय पुढील श्लोकांत सांगितला आहे. जगताच्या कल्याणा करितां ज्यांचा अवतार ते हा सिद्धांत सांगून स्वस्थ कसे बसतील? बळके पुढें उपाय सांगण्या करितांच प्रकृतीच्या बलिष्ठपणाची भीति त्यांनीं अगोदर दाखविली. जसें एखाद्या गृहस्थाला परगांवाला जायाचें असतां रस्त्याची माहिती असलेला कोणी सज्जन मनुष्य त्यास ह्मणतो, तूं अमुक रस्त्यानें जाणार, परंतु या रस्त्यांत अमक्या ठिकाणीं जाळींत एक मोठा वाघ राहत असतो; तो तुला अडवील व कदाचित् तुझा प्राण घेईल. असें ह्मटल्या बरोबर तो जायाला निघालेला मनुष्य हातपाय गाळून खालीं बसतो; मग त्या सज्जन गृहस्थानें सांगितलें कीं, भीति आहे खरी, तथापि तुला उपायही सांगतो. कारण त्या गांवाला तुझें महत्कार्य असल्यामुळे तुला गेलें तर पाहिजेच. आपल्या मार्गांत असलेल्या भीतीचें अज्ञान असण्या पेक्षां ती माहित असलेली बरी. कारण मनुष्य अधिक सावधगिरीनें जातो, व गफलतीनें फसण्याची भीती कधींच नसते. या प्रमाणेंच अर्जुनाला उपदेश करण्याच्या मिषानें भगवंतांनीं प्रकृतीचा बलिष्टपणा सर्व जगास दाखवून, तिच्या तडाक्यांतून सुटण्याचा मार्गही सांगितला आहे. प्रकृती मध्यें कामक्रोधादिक जे आहेत, ते मनुष्याचे बलाढ्य वैरी आहेत. त्याविषयीं साधकानें हुषार राहिलें पाहिजे. गफलतीमध्यें आपण असलों ह्मणजे शत्रु जितका आपणांस पीडादायक होईल त्या पेक्षां सावध असलों तर त्याची पीडा कमी होईल, किंवा कदाचित होणारही नाहीं तेव्हां जरी प्रकृतीस एकदम जिंकतां आलें नाहीं; तरी सतत, सावधगिरीनें, तिच्याशीं टक्कर मारली असता, अनेक जन्मा नंतर तिचा पूर्ण जय करितां येईल. ह्मणजे अभ्यास करतां करतां तिच्यांतील रजोगुण आणि तमोगुण बहुतेक जाऊन ती शुद्ध सत्वरूप होईल, आणि तेणेंकरून जीवास स्वस्वरूपाचें ज्ञान होऊन तो प्रकृतीपासून अगदीं स्वतंत्र होईल. ' बहूनां जन्मनामन्ते ज्ञानवान् मां प्रपद्यते ' असें जे पुढें गीतेंत सांगितलें आहे तें याच करितां. जो कांहीं मोठा काळ पाहिजे तो प्रकृतिच्या जया करितांच पाहिजे. ज्ञानाचा भाग ह्मणजे समजण्याचा भाग फार थोडा आहे. प्रकृतीकडून ज्या मनुष्याची तयारी झाली असेल त्या मनुष्यास गुरु पांच मिनिटांत ज्ञान सांगेल.

वरील निरूपणा पासून दोन फायदे होणें संभवनीय आहे. १ दुसऱ्याचे स्वभाव किंवा कर्में यांची निंदा बंद होईल. व २ ज्या अर्थी प्रकृति एवढी बलिष्ठ आहे त्या अर्थी विद्वान् लोक अहंकार टाकून हळू हळू तिचा जय करण्यास प्रवृत्त होतील, भगवंतांनीं ' निग्रहः किं करिष्यति ' असें जें ह्मटलें आहे, तें प्रकृतीस आह्मी एका क्षणांत जिंकूं असें जे ज्ञानी पुरुष अहंकारानें ह्मणत असतील, त्यांस अनुलक्षून ह्मटलें आहे. प्रकृति सर्वथैव अजिंक्य आहे, असें त्याचें ह्मणणें नाहीं. परमार्थाचा उद्योग श्रीमद्विद्यारण्यांच्या पुढील वचनावर नजर देऊन केला पाहिजे.

कालेन परिपच्यन्ते कृषिगर्भादयो यथा ॥
एवमात्म विचारोऽपि शनैः कालेन पच्यते ॥

जी गोष्ट आत्मविचारास लागू तीच प्रकृतीस लागूं. साक्रेतिस सारख्या पुरुषानें एका जन्मांतच प्रकृतिजय करून आत्मज्ञान प्राप्त करून घेतलें. तथापि या जन्माच्या आरंभीं त्याच्या प्रकृतीचें बळ किती होतें हें त्याचें त्यास ठाऊक. पण धैर्य आणि दृढ निश्चय यांच्या

योगानें तिच्या जयाच्याच मागें लागल्यामुळें त्याचा यत्न सिद्धीस गेला. असें त्यानें आपल्या चरित्रांत झटलें आहे. या प्रमाणें जो कोणी यत्न करील तो पूर्वजन्मा पासून जशी तयारी बरोबर आणली असेल त्या प्रमाणें या जन्मांतहि बराच विजयी होईल पण तेथपर्यंत लोकदृष्टीनें 'वृद्धा नारी पतिव्रता ' असें ह्मणण्याचें वय येईल. अशा वया पर्यंत सिद्धि होवो, किंवा जन्मांतरीं होवो, उद्योगाच्या तीव्रतेच्या मानानें उशि· रा किंवा लवकर सिद्धि होईलच. परंतु मनुष्य प्रकृती प्रमाणें वागतो आणि साधारण पणें निग्रहाचें कांहीं चालत नाहीं, या गोष्टी विषयीं विद्वानांनींही अशांत राहूं नये. मोठ्यांच्या वचनांस कधींच दोष देऊं नये, तीं सत्य मानून ' सिद्धस्य गति श्चिंतनीया ' या ह्मणी प्रमाणें त्यांची सत्यता पाहाण्याच्या खटपटीस लागावें, कित्येक गोष्टी अनुभवानें जाणण्याच्या असतात, तथापि एखादे वेळीं असेंही होईल कीं, एखाद्या गोष्टीचा अनुभव घेण्याची योग्यता स्वतःस नसेल तर अशा वेळीं दुसऱ्यांचा अनुभव घेतला पाहिजे.

आतां हा विषय आटपतों. हा विषय वादा पेक्षां स्वसंवेद्य ह्मणजे ज्याचा ध्यास कळण्याचा असा आहे. प्रकृति बलिष्ठ तर खरीच, तरी पण जिंकण्यास शक्य आहे मात्र ती सुसाध्य नाहीं, कष्टसाध्य आहे. दीर्घ कालाचा अभ्यास आणि ज्ञान यांनीं तिचा जय होईल.

( समाप्त. )

# वऱ्हाडसमाचार

मिती आश्विन शुद्ध ५ शके १८२४

## राष्ट्रीय सभा

गेल्या पावसानें गुजराथेंतील भावी दुष्काळ दूर केला आणि या सुपर्जन्यानें धान्यसमृद्धी चांगली होईल अशी आशा उत्पन्न झाली आहे. गुजराथेंत अशी आबादानी होत गेल्यानें राष्ट्रीय सभेच्या कार्यमालेला मोठा जोर आला आहे असें तिकडील 'प्रजाबंधु ' कर्ते लिहितात. राष्ट्रीय सभेची बैठक चालूं सालच्या अखेरीला अमदाबादेस भरणार आहे तिच्या संबंधानें पूर्वी पासूनच कडेकोट तयारी चालली होती आणि आतां तर त्या तयारीला मोठा जोर आला आहे. निरनिराळ्या व्यवस्थापक कमिट्या नेमण्यात आल्या आहेत पुष्कळशी व्हालंटीअर मंडळी राष्ट्रभक्तांची सेवा करण्याला उद्युक्त आहे. सांप्रतच्या चिह्नें वरून यंदाचा समारंभ गुजराथ प्रांताच्या वैभवाला व लौकिकाला शोभणारा असा होईल. हा प्रसंग मागील सर्व सभास मागें सारील असा तिकडील चळवळीचा ध्वनितार्थ निघतो. वर्गणीचे आंकडे गोळा करण्याचें काम झपाट्यानें चालूं आहे. गुजराथ प्रांतानें पूर्वं इतिहासांत मोठीशी बहादुरी मिळविल्याचें स्मरणांत नाहीं पण येत्या राष्ट्रीय सभेच्या बैठकीनें गुजराथेला निराळेंच महत्व येणार आहे.

या राष्ट्रीय सभेच्या आश्रया खालीं एक प्रदर्शन भरणार आहे. स्वदेशी कलाकौशल्याचें हें प्रदर्शन आहे. ही नवी संस्था राष्ट्रीय सभेला जोडली आहे आणि ती एका दृष्टीनें राष्ट्रीय सभेचें उपांग आहे.√ राष्ट्रीय सभेला राजकीय चळवळींत मोठेंसें यश मिळत नाहीं ह्मणून थोडीबहुत राजकीय गोष्टींत शिथिलताही आलेली आहे. ही शिथिलता आली आहे ही गोष्ट एका दृष्टीनें बरीच आहे. सरकाराच्या तोंडाकडे न पाहतां आपल्याच अंगांतील जोरावर आपले हक्क संपादन केले पाहिजेत असा साधारणपणें नव्या राजधर्मांतील द्वितिय सर्गाचा आशय दिसतो. सरकारापाशीं विनवणी करण्याचा काल गेला. आतां सांपत्तिक स्थिती सुधारली पाहिजे. सांपत्तिक उन्नती सर्व प्रकारच्या उन्नतींचा मूळ आधारस्तंभ आहे. ही एक गोष्ट साधली ह्मणजे बाकीचीं अंगें आपोआप हात जोडून साह्य देतात. अर्थात् अलिकडे राष्ट्रीय सभेच्या कार्यपालेचा मुख्य ओघ या देशी औद्योगिक चळवळी कडे वळला आहे. या दृष्टीनेंच प्रदर्शनाची संस्था संस्थापित झाली आहे. या प्रदर्शनाचा राजकीय गोष्टींशीं संबंध नाहीं असा सरकारी ठराव झाला आहे आणि ह्मणून देशी राजेरजवाडे या प्रदर्शनाला मदत करण्याला प्रवृत्त झाले आहेत ही आनंदाची गोष्ट होय.╳ या प्रदर्शनाला जी चीजवस्तु पाठविली जाईल तिच्या भाड्यातोड्या संबंधानें कांहीं रेलवेनीं पुष्कळशा सवलतीहि दिल्या आहेत. दिल्लीच्या दरबाराचें प्रचंड प्रदर्शन क्षणैक नेत्र सुखाचें होईल पण राष्ट्रीय सभेकडून होणारें प्रदर्शन एक चिरस्थायी संस्था आहे आणि तिच्या भरभराटीवर भावी कल्याणाच्या गोष्टी अवलंबून आहेत हें विसरतां कामा नये. आणि हेंच या प्रदर्शनांत विशेष होय. दिल्ली दरबाराच्या संबंधानें यंदाच्या राष्ट्रसभेलाही मोठें महत्व येणार आहे. नवीन बादशहाच्या साम्राज्याखालीं ही पहिलीच राष्ट्रीय सभा आहे तेव्हां या संस्थेला कांहीं नवीन हक्क राजकृपेनें पुढील दरबारांत मिळतील तर दिल्लीचा दरबार राष्ट्रसभेच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनीं लिहिला जाईल. आपण मोठी हिंमत व आशा धरावी मग आपले मनोरथ पूर्ण करणार परमेश्वर समर्थ आहेच.

## लोकवस्ती

वऱ्हाडचें क्षेत्रफळ १७७०९.८२ चौरस मैल असून एकंदर लोकसंख्या २७,५४,०१६ आहे ह्मणजे या मानानें दर चौरस मैला मागें १५५ माणसांची वस्ती येते. हें प्रमाण गेल्या १० वर्षांपूर्वीं १६३ माणसाचें होतें. गेल्या दहा वर्षांत लोकवस्ती एकंदरीनें वाढली नसून तिचा पाय आंत आंतच येत चालला आहे. गेल्या दुष्काळांत जो माणसांचा संहार झाला त्यामुळें ही लोकसंख्या कमी झाली आणि त्याचा परिणाम दर चौरस मैलावरील लोकवस्तीवरहि झाला आहे.

एकंदरीनें पाहतां वऱ्हाड प्रांतांत लोकवस्ती फार दाट नाहीं, तथापि मध्यप्रांत, मुंबई इलाखा व हैदराबाद संस्थान या भागा पेक्षां लोकवस्ती पुष्कळ खेंचून भरलेली आहे परंतु वायव्यप्रांत, बंगाला, मद्रास व पंजाब या प्रांतापेक्षां वऱ्हाड प्रांताची वस्ती कमी दाट आहे. स्काटलंड व आयर्लंड या दोन देशांमध्यें वऱ्हाडांतल्या प्रमाणें लोकवस्तीची गर्दी नाहीं. लोकवस्तीची दाटी किंवा पातळाई कोठें कशी आहे हें खालील आंकड्यांच्या तुलनेनें नीट लक्ष्यांत येईल.

| प्रांत | दर चौरस मैलीं लोकसंख्या |
|---|---|
| वऱ्हाड | १५५ |
| मुंबई | १३५ |
| मध्यप्रांत | १०२ |
| पंजाब | १७९ |
| वायव्यप्रांत | ४४५ |
| बंगाला | ४१३ |
| मद्रास | २६९ |
| म्हैसूर . | १९८ |
| बडोदा | २४१ |
| इंग्लंड | ५४० |
| स्काटलंड | १३५ |
| स्विटझरलंड | २०७ |

साधारणपणें असें मान आढळतें कीं २२ तालुक्यांपैकीं जवळ जवळ १२ तालुके पाईनघाटाच्या खोऱ्यांत आहेत. या खोऱ्यांतील सपाटीच्या मैदान वर हे बारा तालुके ह्मणजे सर्व आकोला जिल्हा सर्व उमरावती जिल्हा, इलिचपूर जिल्ह्यांतील मेळघाट शिवाय बाकीचे तालुके, आणि बुलढाणे जिल्ह्यांतील मलाकापूर तालुका इतका मुलुख येतो. या सपाटीवरील लोकवस्ती अर्थात् पुष्कळ दाट आहे आणि त्याच्या उलट गोष्ट बालाघाटच्या उंचवट्यावरील मुलुखांतील लोकवस्तीची आहे. हा मुलुख ह्मणजे सर्व वाशिम जिल्हा, सर्व वणी जिल्हा, मलकापूर खेरीजकरून बुलढाणा जिल्हा मिळून ९ तालुक्यांचा भाग येतो. या भागांत लोकवस्ती कमी आहे. मेळघाट तालुका हा नवीनच पाडला आहे आणि यांत प्रांताच्या उत्तरेकडील डोंगराळ जंगलाचा समावेश होतो. किंबहुना हा तालुका जंगलखात्याच्या सोयीसाठींच निराळा पाडलेला आहे. अशा डोंगराळ व जंगलाच्या भागांत लोकवस्ती अती कमी असलीच पाहिजे हें उघड आहे.

## शेतकीचा विस्तार

या प्रांताचें क्षेत्रफळ १,१३,५५,९१४ चौरस मैल आहे. या पैकीं ३१,०१,७३० चौरस मैल जमीन लागवडींत येण्या सारखीच नाहीं. बाकीच्या जमिनींतील ८०,२०,७९६ चौरस मैलांचा मुलुख आज मित्तीला वहितींत येऊन चुकला आहे. फक्त २,३३,३८८ चौरस मैलांचें क्षेत्रफळ वहितींत येण्या सारखें आहे. पण ही वहितींत आणण्याची जमीन उमरावती, आकोला, बुलढाणा, व तसेंच मेळघाट खेरीज करून इलिचपूर जिल्हा मिळून चारही जिल्ह्यांत नाहीं. या जिल्ह्यांतील सर्वच जमीन वहितींत आल्या सारखीच आहे. या जिल्ह्यांतून १०० चौरस मैला मागें अर्ध्या चौरस मैलापासून जवळ जवळ १ चौरस मैला पर्यंत काय ती जमीन लागवडींत नाहीं. हें मान फारच कमी आहे. या भागांतील लोकसंख्या अधिकाधीक शेतकीच्या कामाकडे लागेल त्या मानानें प्रत्येक इसमाच्या चरितार्थीकडे लागणाऱ्या उत्पन्नांतील भाग कमी कमी होत जाईल. ही अवस्था निकृष्ट स्थितीची खूण आहे आणि या पुढें या भागांतील लोकांचें लक्ष्य शेती शिवाय इतर उद्योग धंद्याकडे लागेल तरच योग्य प्रकारें चांगला निभाव लागेल. शेतीच्या विस्ताराची ही गोष्ट इतर उद्योगधंद्यांची आवश्यकता ध्वनित करिते आणि या आवश्यकतेच्या धोरणानें लोकसंख्येचें पाऊल पुढें पडेल तरच कांहीं चांगली सुधारणा होण्याचा संभव आहे.

वर सांगितलेल्या एकंदर २,३३,३८८ चौरस मैलांचें क्षेत्रफळ वहितींत येण्यासारखें आहे याचा अर्थ इतकाच कीं इतक्या जमिनीची वहिती होऊं शकेल पण ती फायदेशीरच होईल असा मात्र त्याचा अर्थ घेऊं नये. पुष्कळशी जमीन वणी जिल्ह्यांतील वणी दारव्हा व केळापूर तालुक्यांतील आहे. या जमिनीची एकणात १,३१,६४७ चौरस मैल आहे. हा मोठा टापू अगदीं डोंगराळ असून शेतकीच्या कार्याला गैरसोयीचा असून त्या पासून मोठासा लाभ होण्याचाही संभव नाहीं वाशिम जिल्ह्यात लागवडींत येण्या सारखी जमीन फार थोडी आहे. तिचा अवघा विस्तार २५,२९९ चौरस मैल आहे.

एकंदरीनें पाहतां असा अंदाजा निघतो कीं, वऱ्हाडांत शेतीचा विस्तार होण्याला मार्गच राहिलेला नाहीं आणि उत्तरोत्तर लोकसंख्येची मुख्य धांव शेतीकडेच आहे. या दोन्ही गोष्टी एकदृष्ट्या ह्मणजे भावी स्थिती सुखकरशी दिसत नाहीं. शेती खेरीज इतर कामधंद्याकडे लोकांची प्रवृत्ती होत जाईल तरच जनसमूहाची सांपत्तिक स्थिती चांगली राहील. गेल्या दुष्काळाच्या वेळीं बहुतेक लोकसंख्या गिट्टी फोडण्याच्या सरकारी कामावर हजर होती. तेव्हांचें तें खेदकारक प्रदर्शन डोळ्यापुढें उभेच आहे आणि तीच गोष्ट आपल्या ह्मणण्याचें खरें प्रत्यंतर होय !

## The Berar Samachar

MONDAY OCTOBER 6 1902

The Educational department seems to have done a good and satisfactory progress in the year 1901—02. We are glad to learn of the happy and progressive career of this department and it is the pleasant feature of this year that the effects of the last famine are no longer an obstacle in the work of imparting instruction to the young generation of the school-going age in the province. The annual report gives a fair account of the good results the department has reached in its ardous work of educating the general public. With the return to days of a good harvest and of a growing prosperity it is but natural that the people should again begin to take a lively interest in the matter of education. Though the villages are not wholly free from the effects of the last famine, the daily attendance in village schools shows a great improvement and we hope that in these times of prosperity the people will realize the lasting

importance of the spread of education and will begin to take an appreciable degree, of interest in popularizing education in the backward classes of the society.

It is the educational department that generally suffers for want of adequate funds. Unlike other branches of administration the claims of this branch do not attract sufficient notice of the Government and we shall not be surprised if we see the Government to defer a large number of important proposals to make education a sure step to all promotions in life either in the service of the Government or in other industrial and useful professions. Mr. Candy has been doing his level best to find out means to spread, on a larger scale, primary education but he does not seem to have reached his aim. All possible difficulties will be thrown in his way and before he succeeds it will be a trial of hard and patient labour and a tedious and protracted work of persuading the Local Government to provide funds for the great and pressing necessities of the department. We sympathise with Mr. Candy in his failure to secure a—new the post of the Educational Inspector for this province. He is informed that his proposal to entertain a highly paid officer next in rank to the Director but above the Deputy Inspectors of each District is no longer acceptable to the higher authorities. The Commissioner thinks that the appointment of one or two additional Sub—Deputy Inspectors to inspect the lowest schools which teach only the first three primary standards will enable the Deputy Inspectors to distribute amongst themselves the special work of the Educational Inspector. This arrangement will no doubt remove the mechanical difficulty of the work of Inspection but we fail to see whether it will achieve the general work of maintaining a higher standard of efficiency and of improving the tone of education on the lines of other advanced provinces in the Indian empire. We are sorry that Mr. Candy does not succeed in re-gaining the post of Inspectorship. He has no doubt lost a great point and the abolition of one high post means a heavy loss to the department and a direct loss to the general cause of education. If we be given the election of abolishing some high posts in the administration we shall never think of doing the work of vandalism in the department of public instruction. It should be the last department for retrenchment. Because here retrenchment will tell heavily upon the spread and quality of education to be imparted in our schools of different grades. Want of funds has been the moral canker of this department. It has crippled its usefulness and has threatened the work of expanding the province of education on all sides in the light of the progress which modern science and appliances have made in the various branches of education. The want of funds is just like a recurring decimal. It does not end with the abolition of the Educational Inspectorship. The primary schools in the province require a better equipment in point of teachers and the appliances of a school—room. There are many places with a population of 300 souls and upwards where there are no primary—schools. There is the greatest need for ... hing new schools in a large n... important villages. But t... will have to be pos... District Boards find adequate funds to make an urgent provision for primary education. Mr. Candy has submitted a special report to the Government of India and we hope that his efforts will be crowned with success.

Another important feature of the report is the progress in the physical education of the young generation. There is a decided improvement in this direction and Mr. Candy deserves a public applause for having placed it on a substantial footing. He has taught young students to take a lively interest in the keen competition of the play—ground. A new liking is created in their hearts for a number of manly games and out—door sports. In Berar at least we shall find no occasion for complaint in the matter of the physical education. Mr. Candy has been further successful in establishing an Athletic Association in Berar. The Association has introduced competitive matches on a wider scale and will in course of time exercise a powerful influence on the physical education of our student world. We wish Mr. Candy a fair measure of success in this branch for which he seems to have a special liking.

---

## वऱ्हाड

हवामान– पुष्कळशा भागांत या नक्षत्राचा हत्तीचा पाऊस थोडाबहुत झाला. पिकें चांगल्या उत्कृष्ठ स्थितींत आहेत. हवा पाणी निरोगी आहे तथापि ऋतूच्या पालटामुळें किरकोळ दुखणीं चळावलीं आहेत.

प्लेगाचा आजार आमच्या प्रांतांतून सध्यांच कांहीं जातोसा दिसत नाहीं. बुल्ढाण्यास त्या दुष्ट तापाचा आजार उद्भवला आहे. चिखली कडील कांहीं खेड्यांतून मोठा कहर उसळला आहे. खामगांवास प्लेगानें लोक आजारी होतच असतात. तेव्हां कोठून काय वार्ता येईल याचा नेमच नाहीं. सर्व गोष्टी ईश्वराच्या हातचा !

पूर्णा नदीच्या कांठी गोपाळखेड आहे. तेथें प्लेग झाला आहे असें ह्मणतात. आमच्या ऐकण्यांत असें आहे कीं, हल्लीं सन्निपात ज्वराचा उपद्रव विशेष आहे आणि या ज्वरांत कांहीं उदाहरणें अशीं झालीं कीं मनुष्याची वाचा बसते, तो बधिर होतो व स्वल्प काळांत मरण पावतो.

बुल्ढाण्याला चार पांच इसमांस प्लेगासारखा दूषित ज्वर झाला असल्यामुळें तेथील वस्तींत मोठी हालचाल झाली आहे.

आह्मास लिहिण्यास दुःख वाटतें कीं उमरावतीचे प्रसिद्ध वकील रा० रा० सदाशिव नारायण मुंबईकर यांस गेल्या मंगळवारीं संध्याकाळीं उमरावतीस देवाज्ञा झाली. मरण समयीं यांचें वय ७२ वर्षांजवळ जवळ यांनीं वकिलीचें काम तीस चाळीस वर्षें केलें. जुन्या वकील मंडळींतील हे पहिले इंग्रजी वकील होते. हे पूर्वी आपच्या शहरीं होते. तेव्हां यांचा धंदा फार उत्कृष्ट चालत असे. ते आकोल्यास होते तेव्हां त्यांच्या नावाचेच कैलासवासी रा० रा० सदाशिव नारायण दुसरे वकील होते. त्या वेळीं आडनांवानें ओळख ठेवीत नसत; ह्मणून त्या गृहस्थांस नाशिककर व यांस मुंबईकर सदाशिव नारायण वकील असें ह्मणत असत. हे गृहस्थ स्वभावानें फार प्रेमळ असत; आणि सर्वजणा बरोबर ते आदर सत्कार पूर्वक वागत असत. वकील मंडळी मध्यें यांसच मुख्य बहुमान देत असत आणि बहुतेक सार्वजनिक कार्यांत हे पुढारी असत. महत्वाच्या जाहिर सभांतून अध्यक्षस्थानाचा मान यांसच देण्याचा उमरावतीस परिपाठ असे. यांनीं सार्वजनिक संस्थांतील पुष्कळसा कार्यभार आपल्या अंगावर घेतलला असे. यांच्या सारखे सद्गुणी, लोकमान्य व वयोवृद्ध गृहस्थ फारच थोडे आढळतील! यांच्या सारख्या ज्या माणसांच्या पुष्कळशा गोष्टी घेण्या सारख्या असतात. विनय, प्रेमळ संभाषण, व आदरसत्कार हे गुण यांच्या अंगीं विशेष असत. यांच्या मरणानें एक मोठाच सद्गृहस्थ नाहींसा झाला ! यांच्या स्मरणा निमित्त उमरावतीच्या कचेऱ्या व मुनिसिपल कचेरी या एक दिवस बंद होत्या. ईश्वर यांच्या आत्म्यास परम शांती देवो !

काल रोजीं सायंकाळीं रा० रा० शंकर नारायण डांगे बी. ए. यांचें 'नामदेव व तत्कालीन धर्मजागृति' या विषयावर सुंदर व्याख्यान झालें.

मि. बी. क्ले असि. कमिशनर हे ह्यांनीं विलायतेस गृहस्थाश्रमाची दीक्षा घेऊन ते रजेवरून मुंबईस परत आले. ते आकोल्यास आपल्या कामावर या आठवड्यांत रुजूं होतील.

---

## नोटीस

बेशमी हिरालाल रेवादास लाला गुजराथी साहू राहणार उगव ता. व पोष्ट आकोला यांस :—

आह्मी खालीं सही करणार या लेखानें कळवितों, कीं तुमचेकडून आमचे वडिलांनीं सुमारें सात वर्षांपूर्वीं ६०० रुपये कर्जाऊ घतले. व त्याबदल गहाणखत करून दिलें आहे. आपण ११८३ रु. आह्मांकडे काढतां, तो आकडा चुकीचा आहे व तो आह्मांला कबूल नाहीं. आपला हिशोब करून आज तारखेपर्यंत वसूल धजा जातां तुमचे देणें ९०३ रु. निघतात ते आह्मी रा. रा. गोविंदा शामजी गुजराथी साहू उगवेकर याच्या जवळ धरोवर ठेविले आहेत. ते आपण नोटीस पावल्यापासून दोन दिवसांचे आंत घेऊन जाऊन आमचा दस्तैवज आह्मांस परत द्यावा व भरपाईची पावती द्यावी. आजपासून आपलें व्याज बंद झालें आहे. आपण फिर्याद कराल तर व्याज व कोर्ट खर्च वगैरे संबंधानें आह्मी जबाबदार नाहीं. कळावें ता. ६।१०।०२ इ०

सह्या

गुलुसा, मुकुंदसा, परशरामसा आणि बाळसा वल्द आत्पारामसा कलाल राहणार उगव दस्तूर खुद्द.

---

## जाहिर नोटीस

मुरशद फकरुद्दीन वल्द अहमदशहा दर्यायी हल्लीं राहणार आकोला यांस :—

खालीं सही करणार अशी नोटीस देतों कीं तुह्मी डिस्ट्रिक्ट रजिष्टरकडे नोंदणे करितां जें दानपत्र दाखल केलें आहे तें माझी सासू रहिमानबक्ष ( ही वेडी आहे ) व माझी बायको मुन्ना ( ही अज्ञान ) व सही करणार ( अज्ञान ) या तिघांचे नांवानें आमचे घराचें दानपत्र भुलथाप देऊन व गुरुपणाच्या जोरावर अन्यायानें व खोटें करून घेतलें आहे. आह्मी घरही तुमचे ताब्यांत दिलें नाहीं व आह्मी रजिष्टरही करून देत नाहीं तें दानपत्र आह्मास बिलकूल कबूल नाहीं. तें आह्मी स्वसंतोषानें करून दिलें नाहीं. व तें पक्केंही करून देणें नाहीं. इतःपर आमचे मर्जी विरुद्ध जरी तें सरकारांतून नोंदण्यांत येईल तरी आह्मी तुह्मास घर किंवा घराचा भाग कांहींच देणार नाहीं.

याच नोटिशीनें सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं अशा मुरशदचा हक्क कोणी घेतल्यास तो फसला जाईल. आह्मी त्यांस कांहीं देणार नाहीं. कळावें ता. ६।१०।०२

सहीची निशाणी

बिसमिल्ला वा। गुलाब राहणार मंगळवारा, आकोला याचे हातची कल्यार.

---

## जाहिरात

मेहेरबान डिपुटी कमिशनर साहेब बहादूर जिल्हा आकोला यांच्या कडील तारीख ४--१०--१९०२ इसवीच्या पत्र नंबर ९०१५ च्या आधारें सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येतें कीं, प्लेगची केस झाल्याबद्दलची खबर प्लेग-अधिकाऱ्यांना देण्याची जबाबदारी प्रत्येक कुटुंबांतील कर्त्या माणसांवर व इतरही माणसांवर आहे. जो कोणी अशी खबर देणार नाहीं त्याच्यावर इंडियन पिनल कोड प्रमाणें मोकद्दमा केला जाईल. ५ आक्टोबर सन १९०२ इसवी.

V. M. Mahajani

व्हाइस चेअरमन, मुनिसिपल कमिटी, आकोला.

---

## जाहिरात

सर्व लोकांना कळविण्यांत येतें कीं, पटवारी लोकांकरितां जमीन मोजणीचें पुस्तक मराठींत छापून तयार केलें आहे. सदरहू पुस्तक पाहिजे त्याला आकोला येथील मेहेरबान डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन साहेब यांचे कचेरींतील डिपोमध्यें विकत मिळेल. किंमत ४ आणे.

E. Marshall

इनचार्ज आफिस आफ डायरेक्टर आफ ल्यांड रिकार्ड्स आणि ॲग्रिकलचर.

---

## वर्तमानसार

दृष्ट दूर दृष्टी— प्रत्येक खेड्यांतून हिंदु-लोकांचीं देवाळयें पडत चाललीं आहेत आणि त्यांचा जीर्णोद्धार करण्याचा प्रयत्न करण्याची बुद्धि, ताकद, इच्छा आणि अक्कल सध्यां हिंदु समाजांत दिसत नाहीं. यास्तव या पडित देवळांचा दगड धोंडा वगैरे मालमसाला सवंग मिळतो तो घेऊन ख्रिस्ती देवळें बांधण्याचा प्रयत्न होईल तर तो इष्ट आहे. आणि त्या दिशेनें आह्मी प्रयत्नास लागावें अशी एका ख्रिस्ती धर्मप्रसारकाची सूचना आहे! एवढा मजकूर वाचून तरी आह्मी कर्तव्यतत्पर होऊं काय? ही आशाही फुकट वाटते.

नवीन प्रकारची कांच— एका शास्त्रवेत्त्यानें नुकतीच एक प्रकारची कांच तयार केली हे. ती शिशा प्रमाणें हवी तशी वांकवितां येते. ठोकून रुंद करितां येते. भोंकें पाडून दुसऱ्या कांचेला जोडतां येते.

कैदी सोडण्याचा विचार— दिल्ली दरबारच्या दिवशीं चांगल्या वर्तणुकीचे कैदी सोडण्याचा सरकारचा विचार चालला असून ह्मा संबंधानें हल्लीं चौकशीही चालू आहे. १८७७ च्या दिल्ली दरबारच्या वेळीं १६००० कैदी बंधमुक्त केले होते. आतां ह्मा वेळीं किती सुटतात पहावें.

परोपकार:—मुंबईतील परोपकारी पार्शी गृहस्थ शेट नवरोजी माणिकजी वाडिया यांनीं आपल्या मिळकतीपैकीं एक कोटी रकमेचें व्याज धार्मिक कृत्याकडे लावण्याचा निश्चय केला आहे. ह्मा कार्यासाठीं सरकारच्या अनुमतानें ते एक ट्रस्टी नेमणार आहेत. दुष्काळ, अग्निप्रळय, धरणीकंप वगैरे अपघातानें झालेल्या दुःख पीडितास ते द्रव्यद्वारा मदत करणार आहेत.

मंगळवार:- ह्मा वाराशीं आपल्या राजेसाहेबांचा संबंध फार असल्या सारखा दिसतो. कारण राजेसाहेब मंगळवारीं जन्मले. त्यांनीं बाप्तिस्माहीं मंगळवारींच घेतला. त्याचें लग्न मंगळवारींच झालें. एका मंगळवारींच त्याना टायफाईड नामक तापानें गांठलें त्यांतून बरें झाल्याबद्दल त्यांनीं देवाची प्रार्थना केली ती ही मंगळवारींच. ते मंगळवारींच राज्यारूढ झाले. आणि परवां ते आजारी असतां शस्त्रक्रियेचा प्रयोग ज्या दिवशीं करण्यांत आला तो दिवसही मंगळवारच होता.

गोऱ्या जोशाचें भविष्य:— दिल्ली दरबार मुळींच भरणार नाहीं. भरला तर तो मंगलपणें पार पडणार नाहीं. नवंबरमध्यें हिंदुस्थानावर संकट येईल; १८ दिसेंबर रोजीं राजघराण्यांतील कोणी तरी मनुष्य मरेल! पुढील सालीं राशिया व फ्रान्स इंग्लंड व जपानावर स्वारी करितील; परंतु या दुसऱ्या राष्ट्रांचा जय होईल; त्या सालच्या दिसेंबरांत स्पेनचा राजा व हालंडची राणी यांजवर संकटें येतील. १९०६।०७ सालीं आफ्रिका व चीन देशांत बंडें होतील. १९१६ सालीं जपानचा राजा मरेल; १९२७ सालीं आयर्लंडला होमरूल मिळेल.

प्रचंड पूल— ब्रह्म देशामध्यें मंडाले शहरच्या ईशान्येस सुमारें ४० कोसावर गोक्टेक नांवाच्या नदीवर सगळ्या पृथ्वींत मोठा असा एक प्रचंड पोलादी आगगाडीचा पूल थोड्या महिन्यामागें बांधिला आहे. ह्माची लांबी २,२६० फूट आहे. उंची ९०० फूट आहे. त्याला एकंदर २१००००० रुपये लागले आहेत.

अजब पोहोणारा— हाल्बीन यानें नुकताच ब्रिटिश चॅनेलमधून पोहून जाण्याचा मोठ्या जोराचा प्रयत्न केला आणि कॅले येथून डोव्हरच्या किनाऱ्याचे अलीकडे एक मैल पर्यंत ह्मणजे त्रेपन मैल अंतर बावीस तासांत पोहून आल्यावर हाल्बीन फार दमला ह्मणून त्याला बरोबरचे बोटवाल्यांनीं वर काढून घेतलें.

नवीन युक्ति— एका तासांत २९० मैल टपाल नेण्याची युक्ति टीगो नामक एका इतलियन इंजनियरानें विद्युत्साह्यानें शोधून काढली असून नेपल्स पासून रोम शहरापर्यंत ह्या नवीन शोधा प्रमाणें टपाल पाठविण्याचा मक्ता तेथील सरकारानें सदर इंजनियरास दिला आहे. पोष्ट खात्याची अपूर्व उत्क्रांति करणारी ही युक्ति आहे. इंग्रेज सरकारचें लक्षही त्याकडे गेलें आहे. ह्या युक्तीनें कलकत्याची डाक मुंबईस ९।६ तासांत सहज येऊं शकेल. ह्मणजे डिफर तारेप्रमाणेंच लोकांला पत्रें मिळूं शकतील !

---

ॐनमः श्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली

आमच्या खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

## मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक, कांतिबुद्धिवर्धक, अशा सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारांवर त्या अत्यंत उपयोगी आहेत.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्भासंबंधीं मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग, मुष्टीमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता, इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें; पचन शक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातु व रक्त यांची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो, दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटें मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयांचे आंत ट० ८६ आणे पडेल. अनुपान खर्ड़ा सोबत. रोखानें किंवा व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील. दर:—

३२ गो० १ रु०; ७५ गो० २ रु०
११५ गो० ३ रु० १६५ गो० ४ रु०;
२७५ गो० ६ रु०; ५५० गो० १०रुपये.

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातूचीं भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं. टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना— अलीकडे २।३ वर्षें आंजारलें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधुस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरीं शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचींच औषधें खालील बिनचूक सही पत्यावरच मागवावीं,

पत्ता—कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी.

---

## खरेदी करा !

### रास्कोपचीं थेट व खरी पेटेंट वॉचेस

### नकली मालास भुलून पैसे खर्चूं नका!!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस ह्मणजे इंजिनियर, कॉंट्राक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वॉच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची **रास्कोपच्या पेटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीती तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करित आलीं आहेत, करित आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येतें, व ह्मा बद्दलची जोखीम दारी आमचे शिरावर आहे.

सूचना:—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान.

**रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें**

१९ लाईन ओपनफेस....................४०
१९ ,, हंटिंग....................५०

**गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.**

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ ,, हंटिंग, नकशीचे ............२५०

**मेटलचें तीन वर्षें ग्यारंटीचें.**

रास्कॉप पेटंट २१ लाईन एकस्ट्रा स्ट्रांग १८
१९ ,, सेकंद कांट्यासह............२०
१९ ,, मध्यभागी सेकंद कांटा असलेलें ..................२२
१९ ,, हाफ हंटिंगचें................२०
१९ ,, हंटिंगेच ....................२०
१४ ,, रिस्ट वॉच ....................२०

**इनगनमेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे**

१९ लाईन ऑपन फेस............२०
१९ ,, हंटिंग........................२०
१४ ,, रिस्टवॉच....................२०

**सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे**

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०
१४ ,, हंटिंग........................३५
१८ व १९ ,, ओपनफेस ............३०
१९ ,, सेकंद कांट्यासह............३२
१९ ,, मध्यभागीं सेकंद कांटा असलेलें ................३५
१९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ ,, हंटिंग ....................४९

लेडिज वॉचीस १४, १८, क्यारेटगोल्ड रुपये ६५-२०० पर्यंत.

**सी. हिनीगर आणि कंपनी,**
ओरिजिनल जिनीयन रास्कॉप पेटंट वॉचेसचे
सोल एजंट.
९ हार्नबी रोड, मुंबई.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्या मान ण खंडेराव फडके यांनीं छापून आहेत.

टाकळी ता

REGISTERED N. No. 4

महामार्ही „ „ ६८
साल अखेर „ ७ „ १
किरकोळ अंकास.... ..................६

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु १
दर ओळीस.......... ६ । व ६ १
दुसरे खेपेस .... ...... ९ ६ १

# वऱ्हाडसमाचार.

Six monthly .........3 ............. 8 as
Single copy ............................ 4 as

Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ...... 4 as
Repetition Per line ...8 as

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVI AKOLA MONDAY 13 OCTOBER 1902 NO 30

वर्ष ३६ आकोला सोमवार तारीख १३ माहे आक्टोबर सन १९०२ इ० अंक ३०

Kadi. हें काय आहे ?

डाक्टर डी. एम. दस्तुर यांनीं तयार केलेली दमा व खोकला या वरील रामबाण औषधी.

दमा आणि खालील सर्व रोगांवर तात्कालिक व गुणकारक उपाय हाच आहे. जेथें डाक्टरांचा व इतरांचा कोणाचाही उपाय चालत नाहीं तेथें हें फार उपयोगी पडतें. याच्या गुणाबद्दल हिंदुस्थान, इंग्लंड व अमेरिका येथील रोगग्रस्तांचे व डाक्टरांचे शेंकडों चांगले अभिप्राय आहेत. कितीही जुनाट दमा, फार दिवसांचा खोकला, घशांत घाघर अवाज होणें, वारंवार सरदी व पडसें होणें, व ताप येणे, ससनी, ब्रान्कायटीस इनफ्ल्युएन्झा इत्यादि रोगांवर हें फार उपयोगी आहे. बाटलीची किंमत सारा १॥ रुपया आहे. परंतु हें रोग्यांस एक हजार रुपयांच्या किंमतीचें वाटतें.

पत्ता--मेसर्स पेस्तमजी आणि सन दुकान आकोला.

## मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल:—

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासुन तें दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपयापर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १।७।०२ } J. Kinniburgh एजंट

## जाहिरात

तमाम लोकांस या लेखाने मी खालीं सही करणार असें जाहीर करितों कीं, माझा दुसरा मुलगा नामें रंगलाल हा १५—१६ वर्षांच्या वयीचा आहे. तो अज्ञान असून माझ्या कह्यांत नसतो. तो कांहीं लुच्च्या लोकांच्या संगतीनें बिघडला असून भटकत असतो. सबब कळविण्यांत येते कीं, त्याजपासून माझी इस्टेट स्थावर वा जंगम कोणी लिहून घेईल किंवा त्यास कर्जाऊ पैसे देईल, किंवा कसल्याही कागदावर सही सूत्रें करून त्याजपासून चिठ्ठी चपाटी करून घेईल तर त्याबद्दल मी जबाबदार नसून ज्याचा तो आहे. माझ्या मुलाचा लेख वा जबानी माझ्या इस्टेटीस बाधूं शकणार नाहीं. सबब त्याजबरोबर कोणीहि कसलाहि देवघेवीचा व्यवहार करूं नये. या उपर केल्यास करणारा फसेल. कळावें तारीख ६ माहे आक्टोबर सन १९०२ इ०

सही

सुरजमल रामनारायण अगरवाले
राहणार जलम ता. खामगांव
दस्तुर खुद्द.

## नोटीस

बेशमी गिरमाजी वल्लद जानजी उजरकार सोनार राहणार धवडी (तळणी) तालुका मलकापूर जिल्हा बुल्ढाणा यांस:-

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुझी लग्नाची बायको आहे. लग्नाला आज १५ पंधरा वर्षे होऊन गेलीं. मी तुमच्या घरीं राहण्याला आली असतां गैर रितीनें तुह्मी मारहाण व शिवीगाळ केली आणि गैरविश्वासाच्या गोष्टी बोलूं लागला. चार पंचा मार्फत तुमची समजूत घालण्याची खटपट मी पुष्कळ वेळां केली. परतु तुमचा विचार मला वागविण्याचा दिसत नाहीं. तुह्मी दुसऱ्याच्या फंदानें वागून दुसरी पाटाची बायकोही केली आहे. माझ्या नांदणुकीची आशा मला दिसत नाहीं. माझा जन्म व्यर्थ चालला आहे. तुह्मी माझ्या पोटापाण्याचीही कांहीं सोय केली नाहीं. आईबापांच्या घरीं इतके दिवस काढले. ते पोटाला देईनात ह्मणून तुमच्या नांवावर सावकारी कर्जही काढलें आहे. ही नोटीस पोचल्या तारखेपासून आठ दिवसांच्या आंत चार पंचाची खात्री करून द्यावी कीं तुह्मी माझ्याशी जनरिती प्रमाणें नीट संसार कराल ह्मणजे मी आपल्यापाशीं येऊन राहण्याला कबूल आहे. सावकारी कर्जही तुह्मी जलदी फेडून टाकावें. असें करण्यास तुह्मी चुकाल तर तुमची वाट पुढें न पाहतां ही नोटीस हीच फारकत समजून दुसरा घरठाव करीन मग तुमचा नवरेपणाचा हक्क मजवर राहणार नाहीं. या नोटिशीचा खर्च, सावकारी कर्ज व दुसरा घरठाव होईपर्यंत होणारी इतर नुकसानी ही तुह्मास द्यावी लागतील. कळावें तारीख ७ आक्टोबर १९०२ इ०

सही

मंजी मर्द गिरमाजी सोनार हल्लीं
नथु वल्लद बापू सोनार यांच्या
घरीं राहणार गांव टाकळी
(इरो) तालुका खामगांव
निशाणी बांगडी.

## नोटिशीचें उत्तर.

बेशमी गिरजाई मर्द खुशाल राहणार पारव प्रगणे बारसी टाकळी तालुके आकोला इस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुमचा नवरा नामें खुशाल वा लक्ष्मण याने आपले मालकीची जमीन मौजे रेटव प्रगणें बारसी टाकळी येथील आमचे पाशीं ताबेगहाण सन १८९१ चे जुलई महिन्यांत रकम रुपये ५०० चे ताबेगहाण दरमहा दर शेंकडा दोन रुपये व्याजाचें देऊन जमीन लिहून ताब्यात दिली. त्या जमीनीचें उत्पन्नाचा हिशेब आज पावेतो देऊन जी आमची रकम घेणें निघेल ती मी देते आणि आमची जमीन सोडून आमचे ताब्यांत द्यावी वगैरे मजकुराची नोटीस वर्तमान पत्रांतून तारीख ११।९।०२ ची दिलेली तारीख ४।१०।०२ रोजीं पावली व त्या नोटिशीचा उलट जबाब तुह्मास देण्यांत येतो कीं तुह्मी तुमचे नवऱ्यानें आह्मास ताबेगहाण लिहून दिलेल्या जमिनीचा हिशेब पाहून, आमचे घेणे व्याजासहित निघत आहे ते देऊन आपली जमीन सोडवून घेणें ही गोष्ट फार चांगली आहे. आता तुमचा ताबेगहाणाचा सर्व हिशेब आमचे वकील रा. रा. नारायण केंडर व फडके वकील आकोला यांचे येथें सर्व हिशेब आज पावेतो व्याजाचा व उत्पन्नाचा आहे. तो तुह्मी पाहून आमचे घेण निघेल त्याची पूर्तता करून तुमची जमीन सोडवून घ्यावी. या प्रमाणें तुह्मी न केल्यास तुह्मास नोटीस पावल्यापासून आठ दिवस वाट पाहून तुमचेवर कोर्टांत दावा करूं आणि व्याजासमेत व कोर्टखर्चासमेत आणि नोटिशीचे खर्चा समेत रकम वसूल करून घेऊं. याच बद्दल आह्मी अजमास १८९५।९६ आणि १९०१ असे दोन वेळ तुह्मास तुह्मी आपला उत्पन्नाचा हिशेब पाहून आमचे घेणें व्याजासुद्धां निघेल ते देऊन जमीन सोडून घ्यावी अशा नोटिसा दिल्या होत्या. त्याचा आज पावेतो निकाल झाला नाहीं. कळावें, त. ९।१०।०२

सही

सयद इमान वल्लद सयद अन्नु मुसलमान याचे खुद्द हातची अक्षरे आहेत. राहणार बारसी टाकळी तालुके आकोले.

## दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्या दांताच्या आजारा वर आणि इतर हरएक प्रकारच्या दाताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अक्सीर का दांतो मे दिखाते है हम ।
खोट डंके की हरेक मर्ज उडाते हम ॥

मोठी डबी.... १ रु.
लहान „ .... ॥-




दांतावर जाळें जमणें, ते पिवळे होणें, हिरड्या दुखणें, दांत आंबणें, हलूं लागणें, कमजोर होणें, भेगा पडणें, किडे पडणें, वांकडें तिकडे होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दांतानीं फोडतां न येणें, दांत मळकट घाणेरडे राहणें, त्यातून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहींशीं होतात, प्रयेक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग या पासून राहणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस् आकोला.

देखना चाहिये क्या मुश्क कदर करती है ।
ढूंढते फिरते हरेक सिम्त कदरदां हैं हम ।

पत्ता—
नन्दलाल वर्मा
ॲण्ड कम्पनी मथुरा.

## विजया दशमीचें सोनें

( १ )

— स्फटिकाचे ते पदस्थ —

विजया दशमी उत्सव वेळा,
आली उदया दुर्दिन लोपुनी ॥
रमवी चित्ता सस्यवती भू,
प्रसन्न सुहासित शोभा दावुनी ॥
प्रेमानंदें सुजन या स्थळीं,
जमले जेवीं हंस मानसीं ॥
धन्य धन्य हा दिवस आजिचा,
वितरे सौख्या जो जन-मानसीं ॥ १ ॥

( २ )

— नृप ममता रामा —

या दुःख कष्टमय जगतीं ॥
सुखकारि परस्पर प्रीती ॥ एक ती ॥
या नश्वर जगतीं कांहीं ॥
शाश्वती प्रीतिची पाही ॥ एक ती ॥
वृद्धिंगत व्हाया प्रीती ॥
सुदिन हे साह्य बहु करिती ॥ सुजन हो ॥
या दिनीं । सुखें भेटुनी ; परस्पर मनीं ।
वाढवा प्रीती ॥
ऐक्याची वाढो महती ॥ सुजन हो ॥ २ ॥

( ३ )

— भला जन्म हा —

आर्य धर्म या शिरोभूषणा उत्तमांगीं
आदरा ॥
लावा वरि भक्तीचा तुरा ॥ ध्रु० ॥
प्रेम बंध बांधुनि हृदयीं अंगरखा ल्या बरा ॥
क्षमेचें उत्तरीय पांघरा ॥
आत्मसंयमन रुचिर वसन तें कटि देशीं
दृढ करा ॥
निर्मल बाह्याभ्यंतर करा ॥
अभिमानाचा करुनि उपानह पदतलीं
त्या सांवरा ॥
यष्टि धैर्याची करि धरा ॥
चाल ॥ अज्ञान तमाची सीमा उल्लंघुनी ॥
सद्विद्या शमितें सद्भावें पूजुनी ॥
सद्बोध हे मनें परस्परां अर्पुनी ॥
आत्मोन्नतिविजया दशमीचा उत्सव
हा साजरा ॥
करावा सानंदें नरवरा ॥ ३ ॥

---

वऱ्हाडसमाचार

---

मिती अश्विन शुद्ध १२ शके १८२४

---

## कलाकौशल्य

इंडियांतील कला किंवा कौशल्यें परकीय राष्ट्राच्या सत्ते खालीं उन्नतीला येण्याचा संभवच नाहीं अशा प्रकारचा निराशेचा उद्गार नेहमीं ऐकूं येतो. कलाकौशल्याची अभिवृद्धी होण्याला स्वतंत्र आणि लोक सत्तात्मकच सरकार असावें लागतें ही समजूत चुकीची आहे. स्वतंत्र राजसत्ता कलाकौशल्याच्या अभिवृद्धीला विशेष अनुकूळ खरी; परंतु ह्या विधानाचा असा अर्थ नाहीं कीं, इतर प्रकारच्या राजसत्ते खालीं कला व कौशल्यें हीं उन्नतीला पोंचणारच नाहींत. कला कौशल्याच्या उन्नतीला जी नानाविध साधनसामुग्री लागते त्या पैकीं अमूक एका प्रकारची राजसत्ता असावी ही एक गोष्ट झाली. ह्मणजे राजसत्ता हें एक उपांग आहे. एखाद्या देशांत राजाची सत्ता चालते, लोकांची सत्ता चालते किंवा कांहीं ठराविक व्यक्तींची सत्ता चालते इत्यादि गोष्टींवर त्या देशांतील कलाकौशल्याच्या उन्नतीचें धोरण नसतें. ज्या राज्यांत प्राणास भिती नाहीं व लोकांस आपल्या मालमत्तेचा सुरक्षितपणा वाटतो त्या राज्यांत कलाकौशल्यें उदयाला येतात. तशांत लोकसत्ता, स्वतंत्रपणा इत्यादि गोष्टी अनुकूल असल्या ह्मणजे दुधांत साखर होते. इंडियाला पाहिजे तितका राजाश्रय अनुकूळ नाहीं ही गोष्ट खरी, तरी याच राज्यांत प्रोफेसर बोस व प्रोफेसर गज्जर सारखीं शास्त्रज्ञ माणसें चमकत आहेत ही गोष्ट भावी अभ्युदयाच्या कालाचीच जबरदस्त खूण आहे. प्रो. बोस यांच्या शास्त्रीय शोधांनीं युरोपांतील राष्ट्राला विस्मित केलें. मुंबईच्या कै० महाराणी साहेबांच्या पुतळ्या वरील डांबर कशानेंही निघेना पण प्रोफेसर गज्जर यांनीं आपल्या उत्कृष्ट कल्पनेनें ते डांबर काढून टाकलें. त्यांची त्या वेळची ती वाहवा आपणा सर्वांचे धन्यवाद गात आहे. उत्तरोत्तर कलाकौशल्याची उन्नती व समृद्धी हीं आपोआप सर्वत्र होणारच. आणि या दृष्टीनेंच आपला हिंदुस्थान कालवशात् अनंत कलाकुसरींच्या चातुर्यानें गजबजून गेल्या शिवाय राहणार नाहीं. मग परकीय अमलाचा लंगडेपणाहि दूर होईल आणि ब्रिटिश सत्ते खालींच आपला देश कलाकौशल्याच्या मैदानांत पाश्चात्य राष्ट्राला अजिंक्य होईल अशी आशा धरण्याला आपणास सबळ कारणें आहेत.

---

कलाकौशल्याच्या अभिवृद्धी संबंधानें अर्थशास्त्राचे कांहीं सिद्धान्त मोठे घातुक होतात. कांहीं वर्षां पूर्वींचा असा ठाम सिद्धान्त होता कीं अप्रतिबंध व्यापाराचें तत्व काय तें सत्य व निरपवादक. या सिद्धान्तामुळें आमच्या देशी कलाकौशल्याचें मोठें नुकसान झालें आहे. कै० महादेव गोविंद रानडे यांनीं हा सिद्धान्त खोडून काढला व इंडियाच्या स्थितीला हें अप्रतिबंध तत्व लागूं पडत नाहीं असें सिद्ध केलें. या देशांत परराष्ट्रीय अंमल आहे, विलायती यंत्राच्या हत्तीनें देशी कलाकौशल्य उध्वस्त केलें आहे, आणि देशी कलाकौशल्याला राजाश्रय नाहीं ह्मणून निरनिराळ्या प्रतिबंधांनीं परराष्ट्रीय व्यापाराला नियंत्रित केलेंच पाहिजे. हे प्रतिबंध सरकार आपणास आणूं देणार नाहीं तर लोकांनीं स्वतःच्या बळावर कंबर बांधली पाहिजे. आमच्या दृष्टीनें हें नवीन बळ ह्मणजे दृढ निश्चयाचें होय. हल्लीं विलायती चिजवस्तू शिवाय आमचा क्षण जात नाहीं; तर आपण पक्का निर्धार केला पाहिजे कीं, मी परकी वस्तूला शिवणार नाहीं, देशी वस्तूच मी वापरीन आणि ती उपलब्ध होईपर्यंत मी ती वस्तूच जगांत नाहीं असें समजेन. असा दृढ संकल्प होईल तोच दिवस सोन्याचा होय! त्याच मुहूर्तावर देशी कलाकौशल्याची उभारणी केली पाहिजे. आमच्या मधील राजेरजवाडे, व श्रीमान लोक हेच आमच्या कलाकौशल्याचे खरे शत्रु होत. ते देशाचे वैरी आहेत असें आह्मी समजतों. त्यांस विलायती आरास पाहिजे, तिकडील अमूल्य वस्तूंनीं त्यांचे दिवाणखाने शृंगारावे लागतात आणि विलायती वस्तूवर त्यांचा जीव कीं प्राण असतो! हा प्रकार बदलला पाहिजे. जे श्रीमान आपल्या देशासाठीं विलायती वस्तू टाकणार नाहींत ते आमच्या देशांत जन्मले नसते तर या आर्यभूमीला शीणही झाला नसता!

---

## वेदान्त

अलिकडे वेदान्त अमर्याद वाढला आहे आणि ह्मणून तो कलाकौशल्याच्या अभिवृद्धीला प्रतिकूळ होतो हे विसरतां कामा नये. सृष्टीचें शास्त्र ही वेदान्ती मंडळी गुंडाळून ठेवितात, त्यांस आत्मा मन वगैरे सारख्या अज्ञेय गोष्टींची मीमांसा फार आवडते, आणि वेदान्ताच्या गुहेंतच ते रममाण होऊं इच्छितात. वेदान्ताचा प्रसार वाईट आहे असें नाहीं परंतु प्रत्येक विषयाला योग्यशा मर्यादा घालून दिल्या आहेत त्या ओलांडतां कामा नये. त्या मर्यादा पाळल्याच पाहिजेत. ज्ञानाच्या ज्या पृथक् पृथक् पायऱ्या आहेत त्या सोडून देऊन जर कोणी सोपानाच्या शिखरावर एकदम जाऊं ह्मणेल तर तो खात्रीनें चुकेल इतकेंच नाहीं तर तो हातपाय मोडून घेऊन स्वतांस निरर्थक व निरुपयोगी करून टाकील. जर कोणाला वेदान्तच सर्व ज्ञानभांडार वाटत असेल तर ती मोठी चूक होय. खरा वेदान्ती जो असेल त्यानें सृष्टीशास्त्राचा हि अभ्यास उत्कृष्ट केला पाहिजे. ज्ञानाच्या सोपानांतील पहिली पायरी ह्मणजे सृष्टिज्ञान आहे. सृष्टीज्ञानानें सत्याचें संशोधन होतें, त्याची विस्फूटता होते, व सृष्ट चमत्कारांतील निरनिराळ्या शृंखला जुळवितां येतात. तत्वज्ञान, वेदान्त, धर्म इत्यादि ज्ञानाच्या निरनिराळ्या पायऱ्या आहेत. त्या क्रमाक्रमानेंच चढल्या पाहिजेत. सृष्टीशास्त्राची पायरी सोडतां कामा नये. आपल्या डोळ्यासमोरील दृश्य सृष्टीचा अर्थबोध प्रथम झाला पाहिजे आणि हा अर्थबोध जसजसा चांगला चांगला होईल तसतशी अज्ञात व अदृश्य वेदान्तविषयांत आपली गती सत्वर व पक्की होत जाईल. वेदान्त आणि सृष्टीशास्त्र हीं पृथक् पृथक्च ठेविलीं पाहिजेत. ज्याचा त्याचा इलाखा स्वतंत्र आहे. हे निरनिराळे इलाखे एकाच ज्ञानरूपी देशाचे भाग असतील, पण त्यांचा निराळेपणा पदोपदीं ध्यानात धरला पाहिजे. अलिकडे तात्विक व वेदान्तपर विषयांच्या नादानें आमच्या पैकीं पुष्कळ लोक सृष्टीशास्त्राचा बरोबर अभ्यास करीत नाहींत आणि ह्मणूनच आमचा धातुविद्या नष्ट होऊन कलाकौशल्यही बुडालें आहे. पृथ्वीवर जर आपण जन्मलों आहों तर आपल्या कृतीनें व ज्ञानानें पृथ्वीला अधिक रमणीय करण्याचें आपलें कर्तव्य आहे. ही रमणीयता सृष्ट पदार्थांच्या सव्य व तुल्य रचनेंत, त्यांच्या रसायनिक मि[illegible] त्यांच्या नानाविध मांडणींत त्यांच्या [illegible] निक जुळवा जुळवींतच आहे. पृथ्वीचें आपल्यावर एक ऋण आहे आणि तें ज्या त्या जन्मांतच फेडलें पाहिजे. [illegible] ऋण फेडतांना [illegible] पृथ्वीला निराळा मनोहरपणा आणितो. [illegible] आपण कलाकौशल्याचीच कांस ध[illegible] पाहिजे. वेदान्तादि गोष्टी सृष्टीशास्त्राला [illegible] आपल्या मर्यादा घालूनच आहेत आणि आपणांस सृष्टीशास्त्र, तत्वज्ञान व वेदान्त या त्रिदल ज्ञानाची प्राप्ती करून घ्यावयाची आहे हें विसरतां कामा नये.

---

## वऱ्हाडचीं शहरें व खेडेंगांव,

वऱ्हाडात ४४ शहरें व ५७१० खेडीं आहेत. या सत्तावनशें दहा खेड्यांत लोक वस्ती आहे यांत उजाड खेड्यांचा समावेश केला नाहीं. गेल्या दहा वर्षांत ५ खेडेगांवांची लोकवस्ती वाढल्यामुळें शहराच्या यादींत गणना केली आहे. सुमारें ७० खेडीं लोकवस्ती उठल्यामुळें गेल्या १० वर्षांत उजाड झालीं आहेत. खेडेगांव आणि शहर यांची व्याख्या अशी बसविली आहे कीं, पांच हजार लोकवस्ती पेक्षां मोठा गांव असला ह्मणजे त्याची गणना शहरांत करावी आणि कमी वस्तीच्या गांवाची गणना खेड्यांत करावी. गेल्या दहा वर्षांत उमरावती जिल्ह्यांतील मुर्तिजापूर, चांदूर, व दत्तापूर असे तीन गांव, इलिचपूर जिल्ह्यांतील चांदूर बाजार, बुलढाण्यांतील चिखली व बुलढाणा आणि वणींतील वणी व दारव्हा असे एकंदर मिळून ८ गांव शहराच्या पंक्तीस येऊन बसले आहेत. या गांवीं लोकवस्ती ५ हजारापेक्षां अधिक वाढली आहे. पण बुलढाण्या संबंधानें लोक वस्तीचें मान फार कमी आहे. तेथें ५ हजारापेक्षां कमी वस्ती आहे तथापि जिल्ह्याचें मुख्य ठिकाण ह्मणून तेथें म्युनिसिपालिटीहि आहे आणि म्युनिसिपालिटीच्या मोठेपणाला तोलून धरण्यासाठीं बुलढाण्याला शहराची संज्ञा देऊन खानेसुमारीचे सुपरिंटेंडंट यांनीं या गांवचा यथार्थ गौरव केला आहे. गांवाचा लघुपणा व मोठेपणा हा नेहमीं बदलत असतो. उमरावती जिल्ह्यांतील पुसला व नांदगांव पेठ हीं दोन गावें व वाशिम कडील उमरखेड हें गांव अशीं मिळून तीन गावें पूर्वीं शहरात मोडत होतीं तीं आतां लोक वस्तीच्या कमतरतेमुळें खेडीं झालीं आहेत. वऱ्हाडांत शहर गांव व खेडेगांव यातील फरक लोकवस्तीवर ठेवण्यांत आला आहे. शहर गांवी शेती शिवाय इतर उद्योग धंदे पुष्कळ असतात. त्या उद्योग धंद्याच्या बाहुल्याला अनुसरून शहर गांवाची मोठी शोभा असते. परंतु वऱ्हाडांतील शहरांत हा उद्योग धंद्याचा फरक फारसा दृष्टीस पडत नाहीं. या प्रांतीं शेती शिवाय इतर उद्योग धंदे फार थोडे आहेत आणि त्यामुळें इतर प्रांतांतील शहरां प्रमाणें इकडील शहरें सुशोभित दिसणार नाहींत. वऱ्हाडात ५७१० खेडेगांव आहेत असें वर सांगितलें आहे. व त्या वरून हा प्रांत फार मोठा असल्याचा चुकीचा समज होण्याचा फार संभव आहे. खेडे गांवाचे जर ४ वर्ग केले आणि ५०० पर्यंत लोक संख्येच्या गांवचा वर्ग पहिला, पांचशेंच्या पुढें आणि हजारापर्यंत लोक वस्तीच्या गांवाचा वर्ग दुसरा आणि एक हजारा पासून तो २ हजारापर्यंतच्या

लोकवस्तीच्या गांवाचा वर्ग तिसरा आणि १ हजारा पासून तों ५ हजार पर्यंतच्या लोक वस्तीच्या गांवाचा वर्ग चवथा अशी वर्गवारी केली तर पहिल्या वर्गांतच ४२८४ खेडेगांवांचा समवेश होतो. या पैकीं सुमारे ८६ खेडीं पूर्वीं उच्च वर्गांत होतीं तीं कमी वस्ती झाल्यामुळें आतां पहिल्या वर्गांत येऊन पडलीं आहे. वाशीम, मोर्शी, मेहेकर आणि उमरावती या चार तालुक्यांत मोठ्या खेड्यांची लहान खेडीं विशेष झालीं आहेत. ५०० लोक वस्ती खाली पुष्कळशीं खेडीं वणी जिल्ह्यांत आढळतात. दुसऱ्या वर्गांत ९६४ खेडीं असून तिसऱ्या वर्गांत ३६३ आहेत आणि चवथ्या वर्गांत काय तीं ११० च खेडीं आहेत या वऱ्हाड प्रांतांत खेडेगांव व शहर हीं दोन्ही सरासरीच्या मानानें इतर जिल्ह्यांपेक्षां मोठी आहेत.

## The Berar Samachar

MONDAY OCTOBER 13 1902

Our Municipal body looked like a small parliament on Friday last when the question was moved of renewing the old Town—fund tax and of imposing a new tax on the total out—turn of the bojas ginned and the bales of cotton pressed. The Municipal Committee had advertised their intentions of levying this new taxation in our issue of 28th July and since then the matter has been a topic of general discussion. Within our experience the advisability or otherwise of taxing the people with new additional burden was a matter left solely to the good sense of our municipal members and the people had seldom found reasons to find faults with the sound discretion of our Municipal Committee. We are proud to affirm that the trust and the confidence of the people has never been shaken in our Municipal Council. For the first time in the history of our Municipality some of the tax payers representing the interests of the ginning and pressing factories in Akola have formed themselves in a body to oppose the proposed measures of taxation within Municipal limits. We are glad that our tax payers are so alive to their interests. It is a novel but pleasing experience to find a hard opposition from the owners of factories within the Municipal limits. Our Municipal Council has been note—worthy for its fearless action and has welcome a fair criticism in a very straight- forward manner. The owners of the factories were allowed to appear before the Municipal Committee through a legal adviser and Friday last was the day fixed for giving a fair and impartial hearing to the side of the opposition. There was a very large attendance of the Municipal members and before them the pros and cons of the subject were discussed in an able and instructive manner. Rao Bahadur R. N. Mudholkar, the distinguished pleader in Berar, was engaged by the opposition and he acquitted himself of the onerous duty in an admirable manner. The main points of his eloquent argument were three in number The first was a legal and technical objection. It was pointed out that under the Municipal Law it is only the persons upon whom the tax can be levied and it is never the process of ginning cotton pressing bales can be made a subject matter of a tax. We cannot here enter into legal aspect of the question but we hope that it will thoroughly be shifted with the legal acumen by the pleaders and judges that are the ornament of the Municipal Council The second objection was raised on the grounds of political economy. The tax to be levied on the quantity of the cotton ginned and the number of bales pressed of such cotton is something like a transit duty; and transit duties are, no doubt, objectionable whenever they act as a bar to the further progress of an industry in the general market. Such a tax is bad when it interferes with the free play of an industry. If it runs down an industry when the latter comes in a copetition with a similar industry in other provinces, the tax is certainly bad and objectionable. If the owners of our factories here can combine to keep up a high price for ginning and pressing cotton we see that there is nothing wrong in the proposal of our Municipality in levying this new tax. If a combination that runs against all principles of free—trade, is equitable and justifiable in the eyes of the owners of the factories, we think that it will be eminently necessary that a transit duty be imposed in a manner to keep down the high rates under the present combination. A transit duty which is certainly fixed at low rate by the Akola Municipality will be a fair and just taxation. The cotton—industry of Akola does not require any measure of protection, nor will it be checked back—wards by the proposed transit duties. The advantages of a great Cotton—Mart like that of Akola are so numerous and valuable that the proposed transit duty is but a poor re—compense and will not be grudged in the least by the people who will have to pay it finally in the long result of such a taxation. There are a number of disadvantages to the people on account of the existence of a number of factories at Akola. Their existence will account for the general rise in the wages of ordinary labour. The high prices of fuel is also another evil of factories which consume an enormous quantity of fuel. People have to suffer a good deal from the dust—clouds in which they become enveloped when the cotton traffic becomes very heavy and brisk. Water-supply of the town falls short because of the numerous people dealing with cotton have to resort to it. There are so many impurities in the air on account of the smoke that spreads all over the city. We do not wish to exhaust the list of these disadvantages. But it is certain that these are the direct effects of the prosperous cotton industry. These factory—owners have yet paid nothing to consult the comforts of the rest of the population. They have been un—mindful of the vast benefits that our local municipality have been conferring for the last twenty years.

It is one thing to take objection to a transit duty; but it is ungratefulness if an eminent owner of factories runs glibly to censure the Municipality for the unreasonableness of their proposal. We see that a very large sum will have to be paid annually by the factory—owners but that is no reason why it should not be demanded. The only fault of the new taxation is that it was not imposed a long time before when the cotton industry had come out of its infancy and began to expand on all directions. It will have to be remembered that the owners of factorities have been exempted from the other professional tax to which the rest of the population is made liable. The Municipal Council has rightly hit the nail when it intends to claim a very insignificant portion of the profits which the owners of factoreis have been making from year to year The existence of such a growing trade has not yet been a source of maintaining a beautiful public garden at Akola nor has it contributed towards any of the municipal exigencies in connection with education, sanitation, water—supply, drainage etc.

The third objection was rather of a household nature. It was contended that the municipality has been doing very well without a paid Secretary and it was thought inadvisable to have a paid Secretary. It was further objected that the municipality should not increase the expenditure on lighting the street. The requisite sum of 60 000 Rupees for completing the drainage system of Akola should, it was argued, be raised by a loan from the government. And it was proposed that the loan should be paid off in regular instalments by a lighter tax than one in view at present. We look upon this third objection as a number of recommendations and we hope that our Municipality will not throw them off unless they see good and substantial reasons for doing so. We are thankful to our Municipal Committee for the calm and patient hearing they had given to the objections of the several owners of the factories put forth in an able and eloquent manner by their counsel Rao Bahadur Mudholkar.

—:0:—

### AN INQUIRER

He puts a querry about the legality of a novel Committee appointed in the last meeting of the Municipallty to hold deliberations and report upon the goodness and otherwise of the proposed taxes. He further refers to the indelicacy and objectionable tone of Rao Sahib Deorao Vynayak when he levelled his vindictives against the Municipal Committee. Indulgence was certainly due to his old age and to his eminent services during the time when he held the office of the Vice—Chairmanship. And this indulgence was amply extended to him by Mr. V. M. Mahajani in his peculiarly modest manner.

## वऱ्हाड

हवामान—ऊन मोठें तीव्र असतें. मधून मधुन आभाळ येऊन उष्माहि होतो. हवा आरोग्यकारक असून इतर रोगराई कोण तीच नाहीं. खामगांवकडे व बुलडाण्याकडे प्लेगाचा आजार चालूच आहे. सध्यां पिकें चांगलीं जोमांत आहेत पण आणखी एखादा पाऊस होईल तर बरें. बाजार भाव नरम तेजीचे आहेत.

आह्मांस लिहिण्यास फार दुःख वाटतें कीं मि० अजिमोद्दीन बी. ए. आफि. एक्स्ट्रा असिस्टंट हे गेल्या मंगळवारीं एकाएकीं निवर्तले. ह्यांस मृत्यु एकाएकीं बोलतां चालतां आला. शेवटच्या घटकेला ह्यांना पक्षघाताची विकृती झाली होती. ह्यांचें वय ३८ वर्षांचे होतें. ह्यांचा कांहीं विद्याभ्यास येथें हायस्कुलांत झाला होता. १८८६ पासून १० वर्ष हे हिंदुस्थानी शाळेचे डेप्युटी इनस्पेक्टर होते. नंतर ६ वर्षे पर्यंत यांनीं तहशिलदारीचें काम केलें. गुदस्ताच ह्यांना असिस्टंट कमिशनरीची बढती मिळाली. इतक्या तरुण वयात ते मरण पावल्यामुळें त्यांच्या आप्तमित्रांस फार दुःख होत आहे. ईश्वर ह्यांच्या आत्म्यास सुखी ठेवो!

नवीन नेमलेले ए. अ. क. मि० प्रेअरो यांची नेमणूक बुलढाणे जिल्ह्याला केली आहे.

रा० रा० विष्णु रंगनाथ शेंबेकर यांस तहशिलदारीवर न धाडतां त्यांच्या सध्याच्या एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनरीच्या जागीं कायम ठेविलें आहे.

येथें गेल्या आठवड्यांत क्रिकेटचे दोन सामने झाले त्यांत आकोल्याची मंडळी चांगली खेळली.

गेल्या विजया दशमीच्या दिवशीं येथील डेप्युटी कमिशनरच्या बंगल्यावर सोनें वाटण्याचा मोठा भव्य समारंभ झाला. गांवांतील सर्व सभ्य गृहस्थांस निमंत्रणें देण्यांत आलीं होतीं. कुमार श्री हरभामजी हे फार लोकप्रिय आहेत आणि ह्यांनीं आपल्या सद्गुणांनीं व मन मिळाऊ स्वभावानें सर्व लोक आपलेसे करून टाकले आहेत.

यवतमाळास 'हरिकिशोर' नांवाचें नवीन वर्तमानपत्र निघूं लागलें आहे. या पत्राचे मालक रा. रा. पृथ्वीगीर हरीगीर हे असून त्यांनीं आपल्या छापखान्याला मो जगदंब असें नांव ठेवलें आहे, आतां फक्त बुलढाणें जिल्ह्यास एका छापखान्याची जरूर आहे. ह्मणजे जिल्ह्यानिहाय या प्रांतीं छापखान्याचा प्रसार होईल.

गेल्या शुक्रवारीं रा. रा. व्यंकटेश कृष्ण देसाई यांनीं वेदांत विषयावर एक सुंदर कथा केली. अलिकडे हे. गृहस्थ ब्रह्म विद्येचा व्यासंग विशेष करीत असतात. आणि त्यांच्या आनंदवृत्ती वरून आह्मांस असें वाटतें कीं मुख्यवस्तु गृहस्थांनीं वेदांत विषयाचा अभ्यास करण्यास चुकूं नये.

## नोटीस

रा. रा. विठ्ठल माधव कुळकर्णी व बापूजी वल्लद गोपाळजी पाटील उभयता राहणार रंगारवासनी तालुके व जिल्हे एलिचपूर

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यात येते कीं तुह्मी तारीख १२ माहे आगष्ट सन १८८९ इसवी रोजीं लिहून दिलेल्या तारणगहाणखतावरून तुमचे कडेस व्याजासुद्धां आज मित्तीला रुपये ८३१ घेणें निघतात. ते तुह्मी नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आत चुकते करून गहाणखत घेऊन जावें. या प्रमाणें न केल्यास तुमचेवर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून कोर्टखर्चासुद्धां व या नोटिशीचे खर्चासुद्धां रिती प्रमाणें रुपये वसूल केले जातील कळावें तारीख ११-१०-०२

सही

सीताराम सखाराम शास्त्री राहणार आकोला दस्तुर खुद्द.

## वर्तमानसार

अत्यंत स्तुत्य कृत्य— बलरामपूरच्या राजानें राज्यारोहणोत्सव निमित्त आपल्या प्रजेस ४०,००० रु. सा-याची सुट दिली. ही योजना अत्यंत प्रशंसनीय होय. असे दयाळू राजे राज्य करण्यास मिळण्यासाठीं अद्भुत पुण्याई लागते.

पक्षांचें उड्डाण—पक्षी फार फार म्हणजे दोन मैलच उंच उडतात आणि इतकेंही फक्त गरूड पक्षीच उडतो आणि बाकी साधारण पक्ष्याचें उडणें हजार पांचशें यार्ड उंचीहून सहसा अधिक होत नाहीं असें या संबंधानें मुद्दाम शोध केलेल्या विमानपटू लोकाचें म्हणणें आहे.

लंडनांतील हिंदु विद्यार्थ्यांसाठीं एक धर्मशाळा व एक सांबाचें देऊळ बांधण्याची खटपट चालली होती, व तीस जयपूरचे महाराज देणगी देणार होते. पण त्यांच्या औदार्यानें आधींच थक्क झालेल्या इंग्रज सरकारानें अशा प्रकारें पैसा खर्च न करण्याची सूचना केली, त्यामुळें महाराजांनींही आपला बेत रहित केला.

विमान उड्डाण— विमानारोहणपटु मि० स्पेन्सर यांनीं लंडन येथें नव्या पद्धतीनें केलेलें विमान ३० मैल आपल्या हुकमतींत फिरवून परत आणिलें.

| प्रांत. | लोक संख्या. | शतायुषी लोक. |
|---|---|---|
| सर्व्हिया | १, लक्ष २० हजार | ५७५ |
| आयर्लंड | ................ | ५७८ |
| स्पेन | १ कोटी ७० लक्ष | ४०१ |
| फ्रान्स | ३ कोटी ८० लक्ष | २१३ |
| ग्रेटब्रिटन | .................. | १९२ |
| जर्मनी | ५ कोटी ५० लक्ष | ७८ |
| नार्वे | २१ लक्ष | २३ |
| स्वीडन | ५० लक्ष | २० |
| डेनमार्क | | २ |
| स्विसरलंड | ............... | ० |

### धाडशी चिनी स्त्री

या स्त्रीचें नांव लिओ असें आहे. तिची मुद्रा फारच सुरेख आणि शांत असल्यामुळें तिला लिओ कुअनयिन (दयेची देवता) असें नांव पडलें आहे. हिच्या मनामध्यें स्वदेशभक्तीची स्फूर्ति उत्पन्न होऊन हिनें आपलें निशाण उभारल्याबरोबर हजारों लोक तिच्या निशाणाखालीं येऊन गोळा झाले. सगळ्या बाक्सर लोकांच्या टोळ्यांपेक्षां हिच्या टोळीमध्यें जास्त लोक आहेत व सगळ्या बॉक्सर पुढाऱ्यांपेक्षां हिचें धैर्य जास्त आहे. अशा प्रकारच्या स्त्रिया ज्या देशांत उत्पन्न होतील तो देश भाग्यवान म्हणून समजलें पाहिजे. स्त्रिया हें सौंदर्याचें स्थान आहे. पण आपलें सौंदर्य, याचा दुरुपयोग न करितां, स्वदेशाला अर्पण केल्यामुळें तिनें आपल्यामध्यें आणि आपल्या देशबांधवांमध्यें विलक्षण स्वदेशाभिमान जागृत केला आहे. असलीं अनुकरणीय उदाहरणें सर्व स्त्रीपुरुषानीं नेहमीं आपल्या डोळ्यांपुढें ठेविलीं पाहिजेत.

कि० दिवाणी दावा नंबर ७ क्लास २१ १९०२

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यानला कर्ज वसूल करण्या बदल सर्टिफिकिट देण्याचा कायदा आक्ट नंबर ७ सन १८८९ यांतील कलम ७ अन्वये नोटीस.

विद्यमान विश्वनाथ नारायण दांडेकर साहेब सिव्हिल जड्ज्य आकोला यांचे कोर्टांत.

अर्जदार— शेराबाई जवजे हरसुकदास मारवाडी हल्लीं वस्ती नागपूर मुखत्यार गणपतराव.

सर्वांस या नोटिसीनें कळविण्यांत येते कीं, वरील अर्जदार यानें मयत हरसुकदास रतनचंद वस्ती अंत्री तालुके बाळापूर यांचे सखाराम वल्लद रायासिंग वस्ती मनकपुरी तालुके बाळापूर याजकडेस येणें असलेले रुपये ६१२८४ व एको वल्लद जैराम वस्ती सिंगोली तालुके बाळापूर याजकडेस येणें असलेले रुपये ८४८९ चे कर्ज वसूल करण्याकरितां सर्टिफिकिट मिळावें म्हणून तारीख १३ माहे सप्टेंबर सन १९०२ इसवी रोजीं अर्ज केला आहे. व त्या अर्जाचे चौकशीची तारीख २९ माहे आक्टोबर सन १९०२ इसवी रोजीं मुकर केली आहे तर सदर्हू दिवशीं १० वाजतां तुम्ही आपले दस्तऐवज वगैरेसुद्धां आमचे कोर्टांत अर्जदार याजला कां सर्टिफिकिट देऊं नये याचें कारण दाखविण्याकरितां हजर व्हावें. माझें सहीनिशीं व कोर्टाचे शिक्यानिशीं ही नोटीस देण्यांत आली आहे.

आज तारीख ६ माहे १० सन १९०२

V. N. Dandekar.

सिव्हिल जज्य

आकोला.

---

॥ ॐनमः श्री गणेशाय. ॥

आर्यवैद्यालय— मुर्डी ता० दापोली

आमच्या खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्यांचे आरोग्या र्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

## मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक, कांतिबुद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारांवर त्या अत्यंत उपयोगी आहेत.

याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मीसंबंधी मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियाची धुपणी, छातीतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुळाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग, मुष्टीमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता, इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें; पचन शक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातु व रक्त यांची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो, दूध व मद्यान्न भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटा मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयांचे आंत ८० ८६ आणे पडेल. अनुपान खर्डा सोबत. रोखानें किंवा व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील. दरः—

३१ गो० १ रु०; ७५ गो० २ रु० ११५ गो० ३ रु० १६५ गो० ४ रु०; २७५ गो० ६ रु०; ५५० गो० १० रुपये.

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातूचीं भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं. टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना— अलीकडे २।३ वर्षें आंगारलें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकळ देशबंधूंस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरीं शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचींच औषधें खालील बिनचूक सही पत्यावरच मागवावीं.

पत्ता—कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

मु० मुर्डी ता. दापोली

जि० रत्नागिरी.

---


## खरेदी करा !

## रास्कोपचीं पेटं व खरी पेटेंट वॉचेस

## नकली मालास भुलून पैसे खर्चूं नका!!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हें वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. म्हणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस म्हणजे इंजिनियर, कॉंट्र्याक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वॉच घेणें विषयीं आम्ही खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची रास्कोपच्या पेटंट वॉचेस संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीती तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येते, व या बद्दलची जोखीम दारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान.

### रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ओपनफेस....................४०

१९ ,, हंटिंग....................५०

### गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०

१९ ,, हंटिंग, नकशीचे ............२५०

### मेटलचें तीन वर्षें ग्यारंटीचें.

रास्कॉप पेटंट २१ लाईन एक्स्ट्रा स्ट्रांग १८

१९ ,, सेकंद काट्यासह............२०

१९ ,, मध्यमागी सेकंद काटा असलेलें ................२१

१९ ,, हाफ हंटिंगचें................२०

१९ ,, हंटिंगेच ....................२०

१४ ,, रिस्ट वॉच ....................२०

### इनगनमेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे

१९ लाईन ऑपन फेस............२०

१९ ,, हंटिंग......................२०

१४ ,, रिस्टवॉच....................२०

### सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१४ लाईन रिस्ट वॉच ............२०

१४ ,, हंटिंग........................२५

१८ व १९ ,, ओपनफेस ..........३०

१९ ,, सेकंद काट्यासह ............३२

१९ ,, मध्यमागीं सेंकद काटा असलेलें ................३६

१९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचें....३१

१९ ,, हंटिंग ....................४१

लेडिज वॉचीस १४, १८, क्यारेटगोल्ड रुपये ६५-२०० पर्यंत.

सी. हिनीगर आणि कंपनी,

ओरिजिनल जिनीवन रास्कॉप पेटंट वॉचिसचे सोल एजंट.

९ हार्नबी रोड, मुंबई.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

महामा...
सहामाही „ ३ „ ८
साल अखेर „ ७ „ १
किरकोळ अंकास......................८४
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.........८१ ०१
दुसरे खेपेस .. . ३......८१

REGISTERED N. No.

Annual in arrears 7 „ 1 Rs 8 as
Six monthly .........3 ............... 8 as
Single copy ............................ 4 as

Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line ...8 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

XXXVI AKOLA MONDAY 20 OCTOBER 1902 NO 31

वर्ष ३६ आकोला सोमवार तारीख २० माहे आक्टोबर सन १९०२ इ० अंक ३१

Kadi हें काय आहे ?

दाक्टर डी. एम. दस्तुर यांनीं तयार केलेली दमा व खोकला या वरील रामबाण औषधी.

दमा आणि खालील सर्व रोगांवर तात्काळिक व गुणकारक उपाय हाच आहे. जेथें डाक्तरांचा व इतरांचा कोणाचाही उपाय चालत नाहीं तेथें हें फार उपयोगी पडतें. याच्या गुणाबद्दल हिंदुस्थान, इंग्लंड व अमेरिका येथील रोगग्रस्तांचे व डाक्तरांचे शेंकडों चांगले अभिप्राय आहेत. कितीही जुनाट दमा, फार दिवसांचा खोकला, घशांत घरघर अवाज होणें, वारंवार सरदी व पडसें होणें, व ताप येणे, ससनी, ब्रान्कायटीस इनफ्ल्युएन्झा इत्यादि रोगांवर हें फार उपयोगी आहे. बाटलीची किंमत सारा १॥ रुपया आहे. परंतु हें रोग्यांस एक हजार रुपयांच्या किंमतीचें वाटतें.

पत्ता--मेसर्स पेस्तमजी आणि सन दुकान आकोला.

## मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल:—

कोणत्याही एका वर्षांत म्हणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपयापर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १।७।०२ } J. Kinniburgh एजंट

## NOTICE

Applications are hereby invited for the post of an Overseer in the Municipality as a temporary measure for two years on a pay of about Rs. 50 including allowances. Persons having a thorough knowledge of public works, draining, surveying, measuring and levelling &c. should apply with testimonials.

Dated Akola 17—10—02 } V. M. Mahajani Vice-Chairman M. Committee Akola.

## नोटिशीचें उत्तर

मे. खाजा गुलाम सैफुद्दीनखा वल्लद खाजा गुलाम जलालुद्दीनखा जहागिरदार कसबे महान राहणार आकोला यांस:—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितों कीं, आपण तारीख १८।९।०२ रोजीं जो नोटीस दिली ती पावली. ९९ रुपयांच्या स्टांपाच्या कागदा करितां सय्यद गफूर राहणार आकोला याजकडून मी पैसे देवविले होते. तो स्टांप कागद सय्यद गफूर यांच्या पाशींच आहे. आह्मां कोणासच त्याचा उपयोग नाहीं. तो तुह्मी ९९ रुपये देऊन टाकून परत घेऊन जावा. असें तुह्मी चार दिवसांत न कराल तर या रुपयावर दरमहा दर शेंकडा २ रुपये प्रमाणें व्याज आपणांस पडेल. हें आपणांस जाहीर व्हावें. कळावें तारीख १४ माहे आक्टोबर सन १९०२ इ०

सही उर्दूंत

शेख इब्राहिम वल्लद महमद अमीर कंट्राक्टर आकोला दस्तुर खुद.

## दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्या दांताच्या आजारा वर आणि इतर हरएक प्रकारच्या दाताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अक्सीर का दांतो मे दिखाते है हम।
चोट डंके की हरेक मर्ज उडाते हम॥




मोठी डबी.... १ रु.
लहान „ .... ·॥·

दांतावर जाळें जमणे, ते पिवळे होणें, हिरड्या दुखणें, दांत आंबणें, हलूं लागणें, कमजोर होणें, भेगा पडणें, किडे पडणें, वांकडें तिकडे होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दांतानीं फोडतां न येणें, दांत मळकट घाणेरडे राहणें, त्यातून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहींशीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग या पासून राहणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस् आकोला.

देखना चाहिये क्या मुश्क कदर करती है।
ढूंढते फिरते हरेक सिम्त कदरदां हैं हम॥

पत्ता—
नन्दलाल वर्मा
म्यानेजर फ्रेण्ड अँण्ड कम्पनी मथुरा.

## संगीत द्यूतविपाक नाटक

— नांदी —

सूत्रधार —

( आधी नमूं या )

प्रेमें प्रणती प्रमथपतीला
शांत करी जो भव दव ज्वाला ॥ ध्रु ॥
निर्लिप निर्वैरी– निस्पंदानें ।
अर्धांगीकृत गौरिकांतिनें ॥
शशि शुभ किरणीं भस्म लेपनें ।
हिम नग पीठें नंदि दीप्तिनें ॥
अतीव धवलित हरतनु विमला ।
शुभदायक ती होवूं सकला ॥ १ ॥

— ( जय यदुपति तव ) —

जयातिजयाति यदुवंशवतंसो
माळांसो मुनिमानसहंसः ।
कंस हरो । वंश धरो । संसारो – । द्ध्वंस
करो । दमित नृशंसः । ध्रु ।
संसारोत्तंसितमापन्नम् ।
विमोचयतु मां कृपया दीनम् ।
स्वपद-कमल-संसक्त-संश्रयो
धुंडिराज कवि गीत प्रशंसः ॥ १ ॥

( पारिपार्श्वक जातात )

सूत्रधार—

( पुढें येऊन ) अहाहा ! वेश वैचित्र्यानें ही रसिक जन सभा श्वेत-नील-रक्त-कमल- चित्रित सरोवरा प्रमाणें नेत्र-युगलाला किती सुख देत आहे. (हात जोडून) हे सहृदय रसिक जनहो —

– दिंडी –

सूचि कंटक पांसुतें त्यजुनि जेवी ।
सुरस केतक मधु मात्र भ्रमर सेवी ॥
तेवि टाकुनि ममदोष अता सारे ।
करूनी घ्या निज तृप्ति गुण–तुषारें ॥ १ ॥

( पडद्याकडे पाहून ) अरे पण माझी प्रिया अजून कां बरं आली नाहीं.

नटी– ( प्रवेश करून ) आर्यपुत्रा ! ही मी आलेंच. काय आज्ञा आहे !

सू०– प्रिये ! नाट्यकले संबंधानें तुझें मत काय आहे !

नटी – माझ्या मतें म्हणाल तर –

( मूगति खरे ते ) —

ही इंदुकळे परि नाट्यकला रमवीते ॥
संताप लोपवुनी हृत्कुमुदा विकसविते ॥ ध्रु ॥
अज्ञान तिमिर घन हरुनि दावि सुपथाते ॥
सुप्रकाश पाडी जगत्स्थितीवरि सुमते ॥
चाल ॥ सुविचार–सुधा वर्षे ही । सत्कला ॥
॥ कवि रत्नाकर सुखदायी। सत्कला ॥
सुख नयन–चकोरा देई । सत्कला ॥
ही रजनी कालिं अधिक मनोज्ञा गमते ॥
संमान्य असे ही सकल विबुध श्रेष्ठांते ॥ १ ॥

सूत्र — वाहवा ! प्रिये अगदीं मना सारखे बोललीस. बरं मी तुला कां बोलावलं हें आलं कां तुझ्या लक्ष्यांत ?

नटी — हो हो — हें शृंगारित रंगस्थळ, ही सुप्रकाश दीपमाळा, ही रसिक जनसभा आणि झालेली प्रस्तावना यानीं कार्य सूचना केलीच– बरं पण प्रयोग कोणत्या नाटकाचा करणार !

सूत्र — ऐक

( गोंडस तनु गुलजार )

शेंबेकर–सद्वंश–समुद्भव ।
रंगनाथ सुत धुंडिराजकृत
नाटक अभिनव ॥ ध्रु ॥
द्यूत विपाकाभिध गीताश्रित ।
शृंगारच्छवि करुण रसप्लुत ।
दावुनि तोषवु रसिक गुणार्णव ॥ १ ॥

या कवीचा आज पहिल्यानेंच परिचय होणार.

नटी — पण प्रियकरा —

( इतुके कां कोपला )
होइल का मान्य ती । नव कविचिया
आद्यकृति ॥ ध्रु ॥
श्रेष्ठ काव्यरस लोलुप रसिका
देइल कां तोष ती ॥ १ ॥

सूत्र— प्रिये ती शंकाच नको कारण –
साकी
जाति मालति कमलादिक तीं
अमित सुपुष्पें असतीं ।
कर्णिकार नव कुसुमिं तरि न ती
होई मधुकर विरती ।
होइल या न्यायें । अभिनव काव्य रसिक
प्रिय हें ॥ १ ॥

प्रिये ! आतां व्यर्थ कालक्षेप नको कारण–
साकी
नव नाटक दिदृक्षु रसिक जन
अत्युत्कंठित दिसती ।
विदर्भराजसुतत्व हा नेसा
निषधेश्वर नल नृपती ।
म्हणुनि चल जाऊं । नाटकपात्रें तीं सजवूं ॥१॥
( जातात ) ( इति प्रस्तावना )

---

## वऱ्हाडसमाचार

मिती आश्विन वद्य ४ शके १८२४

---

यंदाच्या राष्ट्रीय सभेला निराळेंच महत्व आलें आहे. दिल्ली दरबारचा व राष्ट्रीय सभेचा योग एका कालींच आल्यामुळें या दोन्ही कार्यांना परस्पराची पुष्टी व शोभा येणार आहे. जवळ जवळ असा प्रकार होईल कीं, राष्ट्रीय सभेच्या द्वारां प्रजाजन एडवर्ड बादशहांचें अभिनंदन करितील आणि राज्याभिषेकाच्या सुमुहूर्तावर आपल्या नानाविध प्रार्थना मोठ्या स्वामीभक्तीनें राजापाशीं विदित करितील. सरकारालाहि प्रजेच्या मागण्या ऐकून घेऊन त्यांस संतोषविण्याची ही संधी चांगली आली आहे. दिल्ली दरबारासंबंधानें मोठा आक्षेप असा आहे कीं, हा सारा राज्याभिषेक नमून त्याची नक्कल आहे. लक्षावधी रुपयांचा खर्च करून खरोखर लार्ड कर्झन साहेब एका प्रकारें आपल्यालाच राज्यारोहणाचा अनुभव देत आहेत. कांहींहि असो. दिल्ली दरबार बरा किंवा कसा हा प्रश्न आतां उरलेला नाहीं. पण या दरबारच्या समयीं राष्ट्रीय सभेचा बहुमान होईल आणि तिच्या मागणी संबंधानें एखादा सुवर्ण लेख सनदे दाखल देण्यांत येईल तर आह्मी ह्मणतों कीं, हा दरबार चिरकालचा संस्मरणीय होईल. आमची राष्ट्रीय सभा या दिल्ली दरबारचा सदासर्वदां धन्यवाद गाईल आणि यंदाचा हा सुयोग भावी कल्याणराशीची प्रारंभवेळाच होईल.

× × × ×

हल्लीं राष्ट्रीय सभेच्या स्थळा संबंधानें एक वाद निघाला आहे. मद्रासचे प्रसिद्ध हिंदुपत्रकर्ते ह्मणतात कीं, यंदाची राष्ट्रीय सभा दिल्लीलाच भरवावयाला पाहिजे. जेथें सरकारी मोठा दरबार भरणार आहे तेथें प्रजेचीहि मोठी संस्था भरल्यानें एका प्रकारची विशेष शोभा येईल आणि या उभय मेळ्यांच्या संमेलनानें राष्ट्रीय सभेचा इष्ट हेतु विशेष सुसाध्य होईल. ही कल्पना मोठी नामी आहे. आणि आह्मांसहि वाटतें कीं, अशी गोष्ट घडेल तर फार उत्कृष्ट होईल. पण आह्मांला शंका आहे कीं हिंदु पत्रकर्त्यांच्या लक्ष्यांत सर्व अडचणी आल्या नसाव्यात. राष्ट्रीय सभेचा या पत्रकारांना मोठा अभिमान आहे आणि ते तिचे निःस्सीम भक्त आहेत; व देशसेवेच्या आवेशांत त्यांना जें स्फुरण आलें तेंहि अभिनंदनीय होय. पण त्यांचा हेतु सफल होण्याला अडचणी मोठ्या आहेत. पहिली गोष्ट अशी कीं ही सूचना फार उशिरां आली. राष्ट्रीय सभेच्या उभारणीचें मंगलकार्य फार दांडगें असतें. तिच्या संबंधानें पुष्कळच महिन्यापासून जमवाजमव करावी लागते. हें काम अती श्रमाचें, मोठ्या खर्चाचें आणि मंडळींच्या जमावाचें आहे. आज अमदाबाद शहरीं केलेली मांडणूक दिल्लीला नेण्या इतकी शक्ती राष्ट्रीय सभेपाशीं नाहीं. या शिवाय राष्ट्रीय सभा दिल्लीला भरविणें मोठें कठीण आहे. सरकारपाशीं खनिना मुबलक आहे आणि त्याच्या जोरावर सरकार इकडची सृष्टी तिकडे करूं शकते. दिल्ली दरबारामुळें दिल्लीच्या वस्तीला फारच महत्व आलें आहे, आणि तेथें राष्ट्रीय सभा भरविणें अतीच दुर्घट होईल. दिल्लीच्या जवळपासही राष्ट्रीय सभा भरविण्याची सोय नाहीं. दोन वर्षांपूर्वीच पंजाबांत ही सभा भरली होती आणि आतां आपल्या पंजाबबंधूना अधिक शिणविणें यथाकाल व यथान्याय होणार नाहीं. आपल्या मतें यंदाच्या सभेला अमदाबाद शहरच उत्कृष्ट स्थल होय. हें शहर दिल्ली इतकें इतिहास प्रसिद्ध नाहीं तथापि राष्ट्रीय सभेच्या कार्यक्रमांत जो औद्योगिक विषय नवीन घालण्यांत आला आहे त्याला मूळारंभ अमदाबादेसारख्या व्यापाराच्या प्रसिद्ध शहरींच व्हावयाला पाहिजे. या खेरीज रेलवेनें व तारायंत्रानें दिल्ली काय आणि अमदाबाद काय सारखेंच करून सोडलें आहे. सरकारचा बादशाही दरबार जुन्या बादशाही व पुराण प्रसिद्ध नगरींत भरणार आहे हें जसें युक्त आहे तसेंच राष्ट्रीय सभेची औद्योगिक दिशा चिरस्थायी करण्यासाठीं जुन्या अमदाबाद शहराची व्यापारी पेठच राष्ट्रीय सभेला योग्य स्थल होय.

---

यंदाच्या राष्ट्रीय सभेला अध्यक्ष कोणाला करावें या संबंधानें मोठा विचार पडला होता. दिल्ली दरबारच्या गोष्टींची चिकित्सा जशी बारकाईनें होईल तद्वत राष्ट्रीय सभेच्या कार्याचीहि चिकित्सा विशेष बारकाईनेंच होईल हें साहजिक आहे. दिल्लीच्या दरबारांत श्रीमान एडवर्ड बादशहा आपल्या प्रजाजनांना आनंदाचा कोणता निरोप धाडणार आहेत हें कळण्यासाठीं सर्वजण मोठे उत्कंठित आहेत. आणि राज्याभिषेकाच्या अयानंदाच्या समयाला प्रजाजनांच्या वतीनें राष्ट्रीय सभा कोणती अभिनंदन पत्रिका अर्पण करणार आहे हेंहि पाहण्यासाठीं सर्वजण मोठ्या कौतुकानें त्या इष्ट मुहूर्ताची वाट पाहत आहेत. ह्मणून ही गोष्ट निर्विवाद आहे कीं, अशा नाजूक प्रसंगाला चांगला कसलेला, अनुभवी व धुरंधर असाच अध्यक्ष असावयाला पाहिजे पुष्कळशा नामांकित गृहस्थांची यादी पुढें करण्यांत आली होती आणि त्यांत आमच्या प्रांतांतील प्रसिद्ध सद्गृहस्थ राव बहादूर रंगनाथ नरसिंह मुधोळकर हेहि एक होते. शेवटीं बरीच मवति न मवति होऊन आणि ही मोठी कार्यवेळा लक्ष्यांत घेऊन असा निर्णय ठरला कीं, बाबू सुरेंद्रनाथ बानरजी यांसच अध्यक्षश्रीनें माळ घालावी. ही निवड अत्युत्कृष्ट झाली अशा विषयीं सर्व राष्ट्राचें एकच मत पडेल. बाबू सुरेंद्रनाथ बानरजी हे अलौकिक वक्ते आहेत. सरस्वती त्यांच्या तर जिव्हाग्रींच वसते आणि राष्ट्रसेवेंत त्यांच्या इतका निपुण देशभक्त इंडियाला दुसरा मिळणार नाहीं. पूर्वी कवींच्या गणनेच्या प्रसंगीं कालिदासासाठीं अंगुली मोजल्या नंतर जशी अनामिका यथार्थनामा झाली तशीच गोष्ट श्रीयुत सुरेंद्रनाथ बानरजी सारख्या शहाजोग रत्नासंबंधानें आहे.

दिल्ली दरबाच्या सोयी साठीं यंदाची राष्ट्रीय सभा तारीख २४ ते २७ पर्यंत भरवावी असें ठरलें आहे. ह्मणजे या व्यवस्थेनें राष्ट्रीय सभा व दिल्ली दरबार हे दोन्हीही समारंभ आमच्या राष्ट्रांतील प्रमुख मंडळीस साधतां येतील. यंदा दिल्ली दरबारा निमित्त ह्मणा किंवा राष्ट्रीय सभेच्या निमित्तानें ह्मणा आमच्या राष्ट्रांतील श्रीमान व प्रमुख मंडळींचा समूह अमदाबाद शहरीं व दिल्लीस पुष्कळ मोठा जमेल अशी आह्मांस बळकट आशा आहे. आणि बाबू सुरेंद्रनाथ यांच्या व लॉर्ड कर्झन साहेब यांच्या मुखांतून निघणारीं विद्यादेवीचीं मुक्ताफळें सर्व प्रेक्षक समुदास आनंदित करितील.

---

### चांगला कित्ता

अलिकडच्या शिक्षण पद्धतीसंबंधानें मोठी ओरड अशी आहे कीं, विद्यार्थ्यांना मानसिक श्रम मनस्वी पडतात आणि या श्रमातिशयामुळें त्यांची शरीरकाठी दुर्बळ व रोगी बनते. त्यांच्या शरीर संपत्तीची कोणीच काळजी घेत नाहीं. परंतु आमच्या वऱ्हाडच्या विद्यार्थ्यांची ही दुःस्थिती दूर होऊं लागली आहे हें पाहून मनास आनंद वाटतो, मे. क्यांडी साहेब डायरेक्टर झाल्या पासून विद्यार्थ्यांस निरनिराळे शारीरिक श्रमाचे खेळ खेळण्याची व तसेंच कसरत करण्याची मोठी गोडी लागली आहे. आह्मांस उमेद आहे की, कांहीं अधिक वर्षांच्या अनुभवानें आमच्या विद्यार्थी वर्गाचीं शरीरें नीट चांगलीं, कसलेलीं, टवटवींत अशीं दृष्टीस पडतील. शारीरिक शिक्षणाची उणीव अलीकडे बरीचशी दूर होत चालली आहे. पण ह्या शारीरिक शिक्षणा शिवाय निराळीच एक मोठी गरज भागवावयाची आहे. जसें शाळांतून विद्यार्थ्यांला पुस्तकी शिक्षण मिळतें व त्या पद्धतीनें त्याला मानसिक श्रम करण्यास शक्ति येते तद्वत त्याच्या हस्तपादादिकांना योग्य तें वळण देऊन किरकोळ हस्तकौशल्याच्या गोष्टी शिकवावयाला पाहिजेत. हल्लीं शाळांतून मानसिक श्रम करण्याची जशी संवय लागते तद्वत् अंग मेहनतीच्या हस्तकौशल्याच्या गोष्टी त्यांस शिकवावयाला पाहिजे आहेत. शाळेंतील पुस्तकी विद्याप्रमाणें हस्तकौशल्याच्या विद्याहि त्यांस नेमाव्या पाहिजेत असें आतां पक्कें ठरून गेलें आहे. हल्लींच्या शाळांतील विद्यार्थी फार नाजूक बनतात ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. त्यांना शाळेंतील विद्याभ्यास आटोपल्यावर आपले वाडवडिलांचे धंदे करण्याचीही लाज वाटते. त्यांस उन्हातान्हात फिरवत नाहीं, शेतकीचें काम जड वाटतें; व सुतारकी, लोहारकी, किंवा इतर हस्त कौशल्याचीं कामें त्यास कमीपणाचीं वाटतात. आणि प्रस्तुतच्या विद्याचक्रांत फिरफिरल्यानें आणि रात्रंदिवसाच्या अभ्यासानें विद्यार्थी दुर्बळ, लंगडे व लुळा सारखे होतात हेंही आपण पहात आहों. अशा वेळीं आमचे मित्र खानबहादूर शेरमहमदखान यांनीं वर निर्दिष्ट केली उणीव दूर करण्या संबंधानें थोडा पुढाकार घेतला आहे. यांनीं वाशीम तालुक्यातील कांहीं प्राथमिक शाळांमधून हस्तकौशल्याच्या गोष्टी शिकवण्याची व्यवस्था केली आहे. या व्यवस्थेनें विद्यार्थी अगदीं साधारण गोष्टी ह्मणजे वेताचें काम, सुतारकी, दोर तयार करण्याचें काम, पुस्तक बांधणें, शिवणकाम, आणि अशींच इतर साधी हस्तकौशल्याचीं कामें मोठ्या उत्सुकतेनें शिकतात. वाशीम, वाकत, मेडशी येथील शाळांतूनही किरकोळ हस्तकौशल्याचीं कामें शिकवलीं जातात. हा प्रयत्न स्वल्पसा आहे खरा, पण याला चांगलें यश येत चाललें आहे असें वाशिमकडून येणारे लोक सांगतात. या कार्यासाठीं पैशाची अनुकूलता नाहीं ह्मणून खानबहादूर साहेब डगमगले नाहींत. त्यांनीं उदार व श्रीमान लोकांची खात्री करून दिली. कित्येकांच्या जवळ आपलें वजन खर्च केलें आणि प्राथमिक शाळांतून हस्तकौशल्याचीं कामें मुलांस शिकविण्याची आवड लावून दिली आहे. त्यांचे हें उदाहरण कित्ता घेण्यासारखे आहे आणि असाच क्रम इतरत्र ठेवण्यांत येईल तर विद्यालयाची एक मोठी बाजू उर्जित दशेला येईल. हस्तकौशल्याची विद्या शिकविण्याची गोष्ट फार चांगली आहे पण ती सरकारच्या हातून अद्याप अमलांत येत नाहीं ही मोठी दुःखाची गोष्ट होय.

---

### हिंदू धर्म.

( सर्व साधारण कल्पना. )

गेल्या खानेसुमारीच्या रिपोर्टीत हिंदू व महमदी धर्मा संबंधानें बराच उल्लेख केलेला आहे. सन्सस कमिशनरच्या हेतूला अनुसरून सेन्सस सुपरिन्टेंडंट मि. आदेसर दिनसाजी यानीं साधारण हिंदूचा किंवा मुसलमानाचा धर्मा संबंधानें सामान्य ग्रह कोणता आहे. एखादी गोष्ट चांगली किंवा वाईट हें तो धर्माच्या कोणत्या तत्वावर ठरवितो आणि हीं धर्म तत्वें उल्लंघणाऱ्याला काय शिक्षा होत असते या संबंधानें सुलाशानें विचार केलेला आहे. ते ह्मणतात कीं, साधारण हिंदूचा देवावर भरंवसा असतो. त्याला पौराणिक व वैदिक धर्म ग्रंथाची कांहीं माहिती नाहीं किंवा त्याला अर्वाचीन विचाराचेंहि वारें लागलेलें नाहीं असा साधारण

हिंदु विवेचनासाठीं घेतलेला आहे. अर्थात् असा हिंदु ईश्वरवादी असतो; तथापि त्याला त्याच्या धर्माची ह्मणून कल्पना नीटशी नसते. त्याचा जितका एकाच देवावर विश्वास तितकाच अनेक देवांवरहि विश्वास असतो. परमेश्वर सर्व शक्तिमान, सर्वज्ञ, सर्वव्यापी आणि सृष्टीचा स्थितीलय कर्ता आहे असें तो समजतो. आणि याचा असाहि विश्वास असतो कीं, लहान मोठीं अशीं दैवतें पुष्कळ आहेत. वेदकालीन याचा प्राचीन धर्म घटला ह्मणजे सूर्य, अग्नि, आप्, किंवा वरुण यांची उपासना होय. ही वैदिक उपासना साधारण हिंदूला माहीत नसते. पूर्वी अग्निमध्यें जे होम देत असत त्यांचा लोप होत चालला आणि हल्लीं ब्राह्मणांच्या गृहांतून वैश्वदेव करितात तेव्हां अग्निनारायणाला लहान लहान आहुती देत असतात. साधारण हिंदूची उपास्य देवता राम, कृष्ण, शिव, आणि विष्णु ह्या होत आणि ह्या बरोबरच पौराणिक काळा पासून आणखी कांहीं देवादिकांची हिंदू उपासना करीत असतो. कथांतून किंवा पुराणांतून हिंदूला त्याच्या उपास्य देवतेच्या गोष्टी कळतात. ह्या कथापुराणांतून गायनादिकांचेहि प्रकार होत असतात. गांवचा मारुती आणि घरांतल्या देव्हाऱ्यांतील देव यांची पूजाअर्चा करण्याचा हिंदूचा नित्याचा परिपाठ असतो. जो धर्मनिष्ट असतो तो दररोज गांवांतील देवळांत देवदर्शनास जात असतो आणि विशेष प्रसंगीं पूजाअर्चेचा विशेषच विधी असतो. हिंदूंचे कांहीं उपोषणाचेहि दिवस असतात. तीर्थयात्रादि करणें ह्मणजे आयुष्यांतील एक महत् सत्कृत्य समजतात. तथापि तीर्थाटण ह्मणजे केलेंच पाहिजे असा कांहीं प्रकार नाहीं. बनारस, रामेश्वर, पंढरपूर आणि माहूर हीं चार मुख्य पुण्य क्षेत्रें समजतात. आणि या स्थलाची यात्रा ज्याला साध्य असेल तर तो मुद्दाम भक्तीनें करितो. ब्राह्मण भोजन घालणें, व त्यांस दानें देणें हीं फार पुण्य कार्यें समजतात. कांहीं प्रसंगीं तर ह्या गोष्टी अत्यावश्य कराव्या लागतात. सर्व प्राणिमात्रांना कमजास्त मानानें हिंदू पवित्र मानतात. जनावरांमध्यें गोदेवता मोठी पूज्य मानतात. वनस्पतीमध्यें तुळस, पिंपळ, वड आणि बेल हीं झाडें पवित्र मानून त्यांची पूजा करितात. कोणत्याहि धर्मे गोष्टी संबंधानें हिंदू मनुष्य सहसा वाद घालीत नाहीं आणि परधर्मी माणसाबरोबर तो सहसा वाद करण्यास तयार नसतो. त्याच्या मतानें सर्वच धर्म खरे, परंतु ज्या धर्मांत तो जन्मतो तोच धर्म त्याला हितावह वाटतो. ही मनाची निष्ठा वरदृष्टया निश्चिष्ट दिसते तथापि त्याचा परिणाम त्याच्या नित्याच्या आचरणावर मोठाच होत असतो. ह्मणजे त्याच्या अंगीं शांति समाधानी बाणते व तो शेजार धर्माला चांगला जागतो. अशा मनोवृत्तीचा मुख्य परिणाम असा घडतो कीं, दुसऱ्या धर्मा संबंधानें व चालीरीती संबंधानें हिंदू मनुष्य तटस्थ असतो. आणि ही वृत्ती इतकी बळावते कीं परधर्मांच्या देवांचीहि तो पूजा करितांना तो दृष्टीस पडतो. परधर्मीयांचे देव व आपले देव हे कांहीं निराळे नसून ते आपल्या देवाच्याच विभूती आहेत असें तो मानतो आणि या रीतीनें मतभेद किंवा वाद होण्याला हिंदूच्या हातून सहसा संधी मिळत नाहीं.

---

The Berar Samachar

MONDAY OCTOBER 20 1902

Through out the report on the progress of education in Berar during the year 1901—02, we are struck with the complaining mood that recurs at every step when the Director of Public Instruction thinks of improving the present methods of instruction or of introducing a new move in the school curriculum. Want of funds is the main burden of his song. We are sorry that the department of Public Instruction should be so much neglected for want of funds. Educational demands ought to be the first and prime-most charge upon the revenues of the state; and we very much sympathise with Mr. Candy when we find him almost hopeless in the matter of money. Funds are not adequately supplied for years to-gether and the time has come to call upon the Local Government to pay its best considerations for solving the money—problem of the educational department. The matter has been shelved for many years ever since the time of the late Rao Bahadur N. B. Dandekar. If procrastination is ever dangerous, it is more so in connection with this department. The recent experiences of the dire famines have collected a number of minds to think of the great importance of deciding the great issues of making education more practical, more scientific and more fitted to equip the young generations for the coming battle of life. The growth of poverty is alarming and tremendous. And our students' world has come to see more or less the worthlessness of education that is imparted in our schools. As soon as they change the threshold of the school—room and enter upon the threshold of the outside world the whole prospect of their rising hopes and ambition becomes a vast field of stern realities where their education hardly enables them to stand on their legs. The present education does not solve their knotty problem of the bread. It is even asserted that the current course of instruction further enervates the young people and disables them from presenting a bold front to the difficulty that surrounds them on all sides in the larger life of the world. In view of these difficulties Rao Bahadur Bhagwat had bit upon introducing manual training in our high—schools. After a great fight his proposal got the sanction of the higher authorities; and it was proposed to give it a fair trial for a period of full five years. But to our greatest regret we are again told to wait some time more until funds are found for doing the same. Such is the dearth of money and we are almost crippled when a decisive measure is to be taken to better the course of Public Instruction. We are extremely grieved that no margin can be allowed towards education out of the enormous sums that accumulate from year to year on account of the new enhancements in the land—revenue. It is a strange anomaly that the department of education should be starved in such a deplorable manner. Education is the special object wherein the British Government has won its golden triumphs in the early decades of the British rule. But the present interest of the rulers savours of a step—motherly love. It is the educational department that suffers most for want of funds; while every other department goes a happy round of progress and prosperity. If we go over the statistics of the last fifteen years, we assure that we shall prove that no where retrenchment is so prolific and disastrous as in the school department. It is to be noted, however, that the hands on the dial of education cannot be set back-wards. Education is bound to progress. And the only question is what part the government has taken in accelerating this progress. On this ground, we are afraid, we have no congratulations to offer to the Government. It is not enough that education should progress but it is further eminently necessary that the progress of our education should be commensurated with that of other nations of the West. India does not stand aloof from the rest of the world ; she has a very severe competition to face at her doors on account of her connection with the nations of the West : She has already lost her great battle in the field of material prosperity: and has to gain a—new a footing to prepare herself for her battles in the future. It is education that builds up an empire and no government can hope to prosper unless it spends money liberally on education.

—:0:—

Rao Sahib Deorao Vinayak has written to us to hold our views in suspense in connection with the taxes proposed by our Municipality to be imposed on the quantity of cotton ginned and the number of bales pressed in the factories within the Municipal limits; because he hopes that with the knowledge of the version of his side to-gether with the full and detailed arguments which he wants to adduce in support thereof, we are less likely to be one-sided, biased and even unfair. We are quite prepared to give full publicity to his statements and arguments as soon as they will be ready for publication. However Rao Sahib Deorao Vinayak expresses his regret for having inadvertently wounded the feelings of some municipal members, when he passed certain remarks against the grain of their will.

---

## वऱ्हाड

हवामान— चित्रांचें ऊन फार तीव्र आणि कडक पडतें. हस्ताचा पाऊस पुरेसा न झाल्यामुळें कांहीं कांहीं ठिकाणीं जवारी बांडी झाली आहे. हवेंत आरद्रता बिलकुल नाहीं. अद्याप नीट थंडीहि पडत नाहीं व दवहि पडत नाहीं. ताप खोकला वगैरे आजार जोरावर आहेत.

बाळापरास एक व वाडेगांवास एक असे दोन इसम प्लेगानें मरण पावले. हे दोघेहि इसम खामगांवाहून आले होते. बुलढाण्याकडे व खामगांवाकडे प्लेगाचा आजार अजून चालूंच आहे.

ह्या प्रांतीं गेल्या आगष्ट महिन्यांत १४७९१ माणसें जन्मलीं आणि ७४३९ मरण पावलीं. त्या पैकीं ८९ माणसें प्लेगानें बुलढाणे जिल्ह्यांतलीं मेलेलीं आहेत. जन्मांची संख्या फार मोठी आहे.

मि. रा. एन्. सुर्ती ऑ. तहशिलदार दारव्हा यांस दुसर वर्ग मानिस्रेटीचे अधिकार देण्यांत आले,

---

रा. ब. बाळकृष्ण काशिनाथ जोशी पेनशनर असिस्टंट कमिशनर यांस शिकंदराबाद व बोलारम या दोन छावण्यांच्या हद्दींत पहिले वर्ग माजिस्ट्रेट नेमण्यांत आलें आहे. पेनशनर अधिकाऱ्यांना असे फौजदारीच काय पण दिवाणीचे सुद्धां अधिकार देण्याची वहिवाट अधिक अमलांत येईल तर सरकारचा फ[illegible] होऊन पेनशनदारांचाहि बहुमान पूर्ववत् चालेल.

प्लेगच्या भितीनें उमरा, अडगांव बुजरुक आकोट, पिंजर आणि सोनाळे येथील वार्षिक सभा भरणार नाहींत असा सरकारी ठराव करण्यांत आला आहे.

---

### CITATION

In the Court of the District Judge, Akola District.

Miscellaneous civil suit No. 1 of 1902.

Whereas Anna Rezina de souza, widow of Samuel Braganza residing at Akola has petitioned to this court for Grant of Letters of Administration with the will annexed to the estate of the deceased Mr. Samuel Braganza resident of Akola under Act V of 1881. This is to notify to all whom it may be concerned that the claim of the said Mr. Samuel Braganza to the said Letters [illegible] Administration will be f[illegible] heard and determined on th[illegible] November 1902 at 10 [illegible] Akola.

18-10-02 D[illegible]

वचनें
आमच्या
आमचीं
आमची रूढि
[illegible] वचनें असतील
[illegible] मान्यच आहेत. पण
[illegible]रण व रूढि यांच्याशीं ह्या
[illegible]रोध दिसल्यास आमचेंच आ-
[illegible]य आहे. असा वास्तव प्रकार
[illegible]ाराम श्रेष्ठ असें जें आह्मी ह्मणतों
[illegible]ांभिकपण होय. तुकारामाचीं
[illegible]रेवून त्यांतील आशयानुरूप
[illegible]मनाला वळण व व्यासंगांत

खालीं
नारायण सुरजी
ताजनापेठ यांस

अशी नोटीस [illegible] स्वार्थ व परमार्थ यांचा दुकान आमचे पासून [illegible] राहणार नाहीं. १९९८ कार्तिक शुद्ध १ पासून इ० संतजनां- वद्य ३० पावेतों घेतले आहे. आश्विन वद्य ३० रोजीं पुरें [illegible] रा० अगणा- करितां सदर्हू दुकान संवत [illegible]लेल्या उत्तर साला करिता ठोक रुपये [illegible] रोजीं येथील आगाऊ किराया देऊन मागत [illegible]रून तुकारा- सदर्हू दुकान सदर्हू रकमेस [illegible] व्यासंग असल्यास ही नोटीस पावले [illegible]मान बांधण्यास दिवसाचे आंत आह्मांस लेखी पात्रांत रत्नें जर दोन दिवसांत तुह्मी आह्मास[illegible]धूर्चीं वाग्रत्नें विले नाहीं तर आह्मी सदर्हू[illegible]नीं सभासदांपुढें इसमास किरायानें देऊं व नस्वी होतीं हें वद्य ३० रोजीं तें खाली य? तुकारामाचा दिलें तर एक सालचे किवेण्याकरितां होता; ९९० पावशें पन्नास प्रेम व त्याच्या पासून वसूल करण्यांत येतील. कळावें ता. १८।१०।१९०२ मिती आश्विन वद्य २

सही

सिलिमखां दाऊदखां सवदागर दुकान
आकोला मालक आमानखां वल्लद
सिलिमखां सवदागर
दस्तुर खुद्द.

## जाहीर नोटीस

बेशमी मंजुळी मर्द भिवा राहणार एदलापूर ईस. व तमाम लोकांस व नोटीस देणाराचे भाऊबंदास आणि सर्व आप्तांस आणि जिला नोटीस दिली आहे तिचे भाई बिरादरांस व तिचे सर्व आप्तवर्गास या जाहीर नोटिसीनें कळविण्यांत येते कीं:--

मौजे एदलापूर तालुके आकोट जिल्हे आकोले येथील शेतें दोन माझे मालकीची मी माझे स्वतःचे पैशानें माझी बायको नामे मंजुळी मर्द भिवा ईचे नांवानें सुमारें बारा वर्षें झालीं खरेदी घेतलीं आहेत व तीं आज पावेतों माझे स्वतःचेच ताब्यांत आहेत. पण आता तिचा आणि माझा बेबनाव होऊं पाहत आहे तर सदरील गावचीं दोन्ही शेतें कोणी विकत, गहाण, ताबेगहाण अगर बक्षीस घेऊं नये व तिला कर्ज देऊं नये. कर्जरोखा अगर गहाण करून घेतल्यास ते दस्तैवज, तें कर्ज, गहाणखत, अथवा खरेदीखत, सर्व बातल समजलें जाईल. कळावे ता. १५।१०।१९०२ इ०

सही

भिवाजी वल्लद गोपाळा राहणार एदलापूर ता. आकोट पोष्ट अडगांव.

## जाहिरात

लोकांस जाहीर करण्यांत येतें कीं
... कंपनी आकोला या दुकानची
तारीख ३१ आगष्ट सन
... होती तींत ठराव
remar[k]
13th inst... बद्दल पूर्वीचें
with the w... तां रुपये
are, in som... 
on an incor... वा अन्वयें
which I sh...
history of ... ७९ इतके
concise f... शेर २२१
get the ...
questi... कावयाचे आहेत.
seque... घेतला त्यांत पूर्वीचे
biase...
...न शेरची किंमत ३७४८
... तरी ती किंमत कपड्याचे
...ल्यामुळें नवीन शेर घेणाराकडून
...ची किंमत रुपये ३० प्रमाणें
...रा डायरेक्टर यांनीं तारीख ९
... सन १९०२ चे सभेंत ठराव
... करितां ज्या गृहस्थांची हे
... इच्छा असेल त्यांनीं तारीख १
...न १९०३ चे आंत आह्मांकडे
...वे. अर्जाच्या तारखेचे मानानें
... जातील. ते भरल्यावर ज्यांचे
... त्यांस शेर मिळणार नाहींत
...त्याचें पत्रानें कळविण्यांत येईल
...ारखे पासून १० दिवसांचे
...र देण्याचे ठरविलें असेल
...ारचे रुपये प्रत्येकीं ३० प्रमाणें
एकदम दिले पाहिजेत, रुपयाचा भरणा आकोल्यास आमचेकडेस व उमरावतीस रा. रा. रघुनाथ बाळकृष्ण तळवळकर यांजकडेस करावा.

या शिवाय जास्त माहिती पाहिजे असल्यास आकोला येथील कंपनीचे ऑफिसांत खुलासा घ्यावा. कळावें तारीख १४ माहे १० सन १९०२ इसवी.

V. K. Desai
सेक्रेटरी
बिरार ट्रेडिंग कंपनी लिमिटेड
आकोला.

---

विक्रीस तयार.

सोहोनीकृत भरपूर टिपांसहित मराठी

## कायद्याचीं पुस्तकें

सिव्हिल प्रोसिजर कोड- आवृत्ति दुसरी, पानें अदमासें ९०० निवाड्यांची संख्या ६००० किंमत अति स्वस्त केली आहे व्ही. पी. सुद्धा रु. ३

क्रिमिनल प्रोसिजर कोड- (सन १८९८ चा आक्ट ५ वा, १८९९ चा आक्ट १२ वा यानें सुधारल्या प्रमाणें) किंमत ५ रुपये व टपालखर्च ०१० आणे.

क्रिमिनल प्रोसिजर कोड— जुना आक्ट (सन १८८२ चा १० वा) किंमत ५ रुपये व टपाल खर्च ०१० आणे.

जुनें व नवें क्रिमिनल प्रोसिजर कोड एकत्र बांधविलेलें घेतल्यास वरील दोन्हीं पुस्तकांची किंमत टपाल खर्चासुद्धां ८४.

दिवाणी आक्टसंग्रह- (यांत दिवाणी कामास लागणारे सर्व आक्ट आहेत, पानें अदमासें ५०० ) किंमत टपाल खर्चा सुद्धां २८

म्यानेजर, डेक्कन बुक एजन्सी,
सदाशिवपेठ, पूना सिटि.

नारो अप्पाजी गोडबोले
बुकसेलर बुधवार पेठ.

---

ॐनमः श्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली

आमच्या खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

### मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक, कांतिबद्धिवर्धक, अभ्रक सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारांवर त्या अत्यंत उपयोगी आहेत.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मीसंबंधीं मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र याचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग, मुष्टीमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता, इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें; पचन शक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातु व रक्त यांची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व अन्न भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटा मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयांचे आंत ट० ४६ आणे पडेल. अनुपान खर्चा सोबत. रोखानें किंवा व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील. दरः—

३१ गो० १ रु०; ७५ गो० २ रु० ११५ गो० ३ रु० १६५ गो० ४ रु०; २७५ गो० ६ रु०; ५५० गो० १०रुपये.

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातूचीं भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं. टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना— अलीकडे २।३ वर्षे आंजा रलें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधूस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरीं शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचींच औषधें खालील बिनचूक सही पत्यावरच मागवावीं,

पत्ता—कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी.

---

## खरेदी करा !

### रास्कोपची थेट व खरी पेटेंट वॉचेस

### नकली मालास भुलून पैसे खर्चु नका!!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. म्हणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस म्हणजे इंजिनियर, कॉंट्र्याक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वॉच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची **रास्कोपच्या पेटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीती तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येतें, व त्या बद्दलची जोखीम दारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान.

### रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ओपनफेस........................४०
१९ „ हंटिंग........................५०

### गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ „ हंटिंग, नकशीचे ..........२५०

### मेटलचें तीन वर्षे ग्यारंटीचें.

रास्कॉप पेटंट २१ लाईन एकस्ट्रा स्ट्रांग १८
१९ „ सेंकंद कांट्यासह............२०
१९ „ मध्यभागी सेकंद काटा असलेलें ................२२
१९ „ हाफ हंटिंगचें................२०
१९ „ हंटिंगेच ......................२०
१४ „ रिस्ट वॉच ....................२०

### इनामल्मेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे

१९ लाईन ओंपन फेस............२०
१९ „ हंटिंग........................२०
१४ „ रिस्टवॉच....................२०

### सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०
१४ „ हंटिंग............................३५
१८ व १९ „ ओपनफेस............३०
१९ „ सेकंद कांट्यासह............३२
१९ „ मध्यभागीं सेकंद काटा असलेलें ................३६
१९ „ ओपनफेस सुंदर नकशीचे....३६
१९ „ हंटिंग .................... ४९

लेडीज वॉचीस १४, १८, क्यारट गोल्ड रुपये ६५-२०० पर्यंत.

सी. हिनीगर आणि कंपनी,
ओरिजिनल निनीयन रास्कोप पेटंट वॉचेसचें सोल एजंट.
५ हार्नबी रोड, मुंबई.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.